रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २१० । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

## पनवेल शहरात चोरीची घटना

**पनवेल :** शहरातील जय भारत नाका येथील रोनक झेरॉक्सच्या खाली असलेले दुकान चोरट्यांनी फोडल्याची घटना सोमवारी (दि.५) पहाटेच्या सुमारास घडली. दुकान मालकांच्या माहितीनुसार, ही चोरी दुसऱ्यांदा झाली असून, यावेळी चोरट्यांनी शटर उचलून आत प्रवेश केला. दुकानातील काही रोख रक्कम तसेच टॅब चोरीस गेल्याचे सांगण्यात आले आहे. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोराचा चेहरा स्पष्टपणे कैद झाला असून, त्याआधारे तपासाला गती मिळण्याची शक्यता आहे. व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, चोरट्यांचा लवकर शोध घेण्याची मागणी केली जात आहे.

अलिबाग- नागाव प्रॉपर्टी विकणे

अलिबाग- नागाव हायवे टच, लक्झरीयस् प्रॉपर्टीज, ३१ गुंठे रेडी टू बिल्ड प्लॉट फार्महाऊस/रिसॉर्ट/हॉटेल साठी योग्य, नागाव बीच १. २ किमी. प्राईम लोकेशन, इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, ५०+ नारळ, सुपारी आणि हापूस आंब्याची झाडे, उत्तम कनेक्टिव्हिटी, परमंट कंपाउंड, क्लिअर टायटल, रेडी सर्च रिपोर्ट, एजंन्ट सुध्दा चालेल.

मालक: 9769108170

## वेधक

### हक्क बजावण्यासाठी 'नोटा'चा पर्याय

**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत फ्री अँड फेअर निवडणुकीच्या धोरणाला हरताळ फासले आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी लोकशाही गुंडाळून टाकली असून पैशाचा खेळ सुरु आहे. मतदानाआधीच घोडेबाजार सुरु असून भाजपा महायुतीची सत्तेची भूक लोकशाही गिळंकृत करण्यापर्यंत पोहचली आहे. महानगरपालिका निवडणुकांमध्ये 'बाप बड़ा ना भैया, सबसे बड़ा रुपैया'चे वगनाट्य जोरात सुरु आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी 'नोटा'चा पर्यायही आहे, बिनविरोधच्या ठिकाणी मतदारांना 'नोटा' वापरण्याची संधी द्यावी, असेही ते म्हणाले. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

### एसटी विभागाच्या कारभारावरून नाराजी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य महामंडळाच्या ताफ्यात ८ हजार नवीन बसेस दाखल होतील अशा पद्धतीने सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया तातडीने गतिमान करण्यात यावी. यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. अन्यथा संबधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दम परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. ते एसटी महामंडळाच्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत बोलावलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. तसेच, यावेळी त्यांनी एसटीच्या विविध विभागांकडून सुरू असलेल्या संथ व कूर्मगती कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### दुचाकीच्या डिक्कीत जिवंत हँडग्रेनेड

**ठाणे :** राज्यात सध्या महानगरपालिकेच्या निवडणूकीची धामधूम सुरू असतानाच ठाणे शहरात एका दुचाकीच्या डिक्कीत जिवंत हँडग्रेनेड सापडल्याने खळबळ उडाली आहे. ठाण्यात एका महिलेवर गोळीबार केल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीच्या बाईकच्या डिक्कीत जिवंत हँडग्रेनेड सापडले आहेत. सध्या पोलीस या प्रकरणी आरोपीची कसून चौकशी करत आहेत. दिव्यातील साबेगाव येथे राहणाऱ्या शिवशंकर राममुरत विश्वकर्मा या व्यक्तीला महिलेवर गोळीबार केल्याप्रकरणी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तपासादरम्यान त्याच्या बाईकमधून पोलिसांना जिवंत हॅण्ड ग्रेनेड सापडले. बॉम्बशोधक पथकाने तत्काळ ते हँडग्रेनेड निकामी केले आहे.

# वसतिगृहे भाड्याच्या घरात

प्रमोद जाधव

। रायगड ।

**मागासवर्गीय तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल मुलांसह मुलींना शिक्षण घेता यावे, यासाठी रायगड जिल्ह्यात शासकीय वसतिगृहे उभारण्यात आली आहेत. मात्र, त्यातील पाच वसतिगृहे भाड्याच्या घरात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना हक्काच्या वसतिगृहाची प्रतिक्षा लागून राहिली आहे. तसेच, भाड्यापोटी लाखो रुपये खर्च केले जात असल्याची माहिती समोर येत आहे.**



## मागासवर्गीय मुले, मुलींना हक्काच्या वसतिगृहासह शाळेची प्रतिक्षा

रायगड जिल्ह्यातील अनूसुचीत जाती, नवबौद्ध, तसेच आर्थिक दृष्ट्या मागासवर्गातील मुले व मुली शिक्षणापासून वंचित राहूनये. त्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, यासाठी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण अंतर्गत जिल्ह्यामध्ये महाड, अलिबाग, तळा, पाली-सुधागड, पनवेल माणगाव येथे आठ शासकीय वसतिगृहे उभारली आहेत. त्यामध्ये पनवेल, पाली, माणगांव व तळा येथे प्रत्येकी एक वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांमध्ये महाड येथील मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, तळा येथील मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, माणगाव तालुक्यातील जावळी येथील अनुसूचित जाती, नवबौद्ध मुलांकरीता शासकीय निवासी शाळा मालकीच्या जागेत आहेत. तसेच, अलिबागमधील मागासवर्गीय मुला मुलींचे व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, महाड येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पाली-सुधागड येथील मागासवर्गीय व आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह भाडे तत्वावर चालविले जात आहे. या सर्व वसतिगृहांमध्ये ७८० मुला मुलींना मान्यता आहे. या वसतिगृहामधून शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जूनपासून शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु केली जाते. सध्या या वसतिगृहांसह शाळांमध्ये दोनशेहून अधिक विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे.

मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकातील कुटूंबामधील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत ही योजना राबविण्यात आली आहे. अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत आहे. परंतु, शासनाच्या मालकीची फक्त तीनच वसतिगृहे आहेत. अन्य पाच वसतिगृहे खासगी जागेतून चालविली जात आहे. त्यामुळे महिन्याला भाडेपोटे लाखो रुपये खर्च करण्याची वेळ शासनावर येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही वसतिगृहे खासगी जागेतून चालविली जात आहेत. प्रत्यक्ष जागा असूनही त्याठिकाणी नव्याने वसतिगृहे बांधण्यास शासनाकडून निधीची तरतूद केली जात नाही. त्यामुळे भाडेतत्वावर वसतिगृहे चालविली जात आहे. भाड्यापोटी होणाऱ्या खर्चाच्या जागी नव्याने शासकीय वसतिगृहे मालकीच्या जागेत बांधल्यास हा खर्च बचत होण्यास मदत होणार आहे.

### शासकीय इमारतीला मंजुरी

अलिबागमधील शासकीय वसतिगृहाची इमारत गोंधळपाडा येथे होती. परंतु, ही इमारत जीर्ण झाल्याने खासगी जागेत वसतिगृह उभारण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून भाडेतत्वावर या इमारतीचा कारभार चालत आहे. या शासकीय वसतिगृहाच्या इमारतीला ८ कोटी ५७ लाख ८९ हजार रुपयांच्या निधीची मंजुरी देण्यात आली आहे. अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे हक्काची इमारत लवकरच उभी राहणार आहे.

### ही आहेत वसतिगृह

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अलिबागमध्ये समाजकल्याण कार्यालय आहे. या कार्यालयाच्या अखत्यारित महाड, तळा व अलिबागमध्ये मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहे आहेत. महाड व पनवेल येथे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. तसेच, अलिबाग व पाली-सुधागडमध्ये मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. तर, माणगावमधील जावळी येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांकरिता शासकीय निवासी शाळा आहेत.

> जिल्ह्यात पाच वसतिगृह खासगी इमारतीमध्ये आहेत. भाडेतत्वावर ही वसतिगृहे आहेत. शासनाच्या मालकीच्या जागेत ही वसतिगृहे व्हावीत, यासाठी प्रयत्न केले आहेत. पनवेल येथील वसतिगृहाचे काम चालू आहे. अलिबाग व पाली येथील वसतिगृहाच्या कामाला मान्यता देण्यात आली आहे.
>
> – सुनील जाधव, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग

# आदीवासी वाडीला 'लंपी'ने ग्रासले

## पशुसंवर्धन विभागाचे जाणिवपुर्वक दुर्लक्ष

। नेरळ । प्रतिनिधी ।



कर्जत तालुक्यातील माथेरानच्या डोंगरात असलेल्या आदिवासी वाडीमधील शेतकरी चिंतेत पडले आहेत. त्यांच्या जनावरांना आणि पशूंना लंपी आजाराने ग्रासले असून त्याकडे पशुसंवर्धन विभागाचे जाणिवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांच्याकडून होत आहे. याबाबत आदिवासी संघटनेच्या जिल्हाध्यक्षांकडून पशुसंवर्धन विभागाला अल्टिमेटम देण्यात आला आहे. जर एखादे जनावर दगावले, तर शेतकऱ्यांना त्यांच्या जनावरांची नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आदिवासी संघटना आंदोलन करेल, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील आसल ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या आदिवासी वाड्या या माथेरानच्या डोंगर रांगेत वसल्या आहेत. त्या ठिकाणी सागाची वाडी, चिंचवाडी, मना धनगर वाडा, आसल वाडी, नाण्याचा माळ इत्यादी वस्ती असून या भागात राहणारे आदिवासी लोकांचा दुग्ध व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे प्रत्येक घरात पशू आणि जनावरे असून त्यांची देखभाल हे आदिवासी लोक करीत असतात. परंतु, त्या भागातील काही शेतकऱ्यांच्या पशूंना लंपी आजाराने ग्रासले असून पशुसंवर्धन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. अनेक लहान पशू देखील या आजाराने त्रस्त असून आदिवासी शेतकरी चिंतेत सापडले आहेत. आदिवासी लोकांचे पशुधन हे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन असून आदिवासी समाजातील शेतकरी जगला पाहिजे यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणेने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची तयारी दाखवायला हवी, अशी मागणी आदिवासी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मालू निरगुडे यांनी केली आहे.

तसेच, सागाची पान २ वर

### आंदोलनाचा इशारा

माथेरान डोंगरात मोठ्या प्रमाणात आदीवासी वास्तव्यास आहेत. त्यांचा उदरनिर्वाह शेती व दुध व्यवसायावर चालतो. त्यामुळे हे लोक पशू आणि जनावरे पाळतात. परंतु, त्यांना लंपी या आजाराने ग्रासले आहे. त्यामुळे येथील आदिवासी शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. याकडे पशुसंवर्धन विभाग जाणिवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे. तसेच, एखादे जनावर दगावल्यास त्याची नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आदिवासी संघटना उपोषण करेल, असा इशारा देण्यात आला आहे.

# नोकरी लावण्याच्या बहाण्याने फसवणूक

। उरण । प्रतिनिधी ।

जेएनपीटीमध्ये एक्स्पोर्ट असिस्टंट मॅनेजर पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत एका तरूणाकडून लोखो रुपयांची उकल केल्याची धक्कादायक बातमी समोर येत आहे. मोहम्मद फहिम अब्दुल कलिम कुरेशी असे पीडित तरूणाचे नाव आहे. वाशी पोलिसांनी ऋषभ राजेश म्हात्रे (२४) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जानेवारी २०२४ मध्ये ऋषभ म्हात्रे याने जेएनपीटीमध्ये असिस्टंट मॅनेजरपदासाठी भरती असल्याचे सांगत कुरेशी यांच्याकडून सी.व्ही. मागवला. त्यानंतर एक्स्पोर्ट असिस्टंट मॅनेजर पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत सुरुवातीला ३० हजार रुपये घेतले. पुढे त्याने नियुक्तीपत्र, सॅलरी स्लिप, परीक्षा क्लीअरन्स प्रमाणपत्र, कन्फर्मेशन लेटर, पेनल्टी पान २ वर

# दरोडा प्रकरणातील आरोपी गजाआड

## रायगड पोलिसांची धडाकेबाज कारवाई

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।



मापगाव येथील सशस्त्र दरोडाप्रकरणातील सात जणांना गजाआड करण्यात आले आहे. अलिबाग पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने ही संयुक्त कारवाई केली आहे. या धडाकेबाज कारवाईने अवघ्या काही तासांमध्ये आरोपींच्या मुसक्या आवळण्यात रायगड पोलिसांना यश आले आहे.

मापगाव येथील पाथरे यांच्या घरावर शनिवारी (दि.३) मध्यरात्री सशस्त्र दरोडा टाकण्यात आला होता. यावेळी घरातील मंडळींना डांबून ठेवण्याबरोबरच पेट्रोल अंगावर टाकून जीवे ठार मारण्याची धमकीही देण्यात आली होती. दरोडेखोरांनी घरातील दागिने व रोकडसह १८ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत फर्णे यांच्याकडे तपास सोपविण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. अलिबाग पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने संयुक्तरित्या तपास सुरु केला. सीसीटीव्ही कॅमेरांसह वेगवेगळ्या माध्यमातून दरोडेखोरांचा शोध घेण्यात आला. अखेर त्यांना पकडण्यास रायगड पोलिसांना यश आले. गुन्ह्यातील ७ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर काही तासांतच हा गुन्हा उघडकीस आणण्यास पोलिसांना यश आले. तसेच, हे दरोडेखोर भिवंडी परिसरातील असल्याची माहिती समोर येत आहे.

# विवाहिता मुलांसह बेपत्ता

। पनवेल । प्रतिनिधी ।

उलवे येथील एक विवाहिता आपल्या दोन मुलांना घेऊन बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार तिच्या पतीने उलवे पोलीस ठाण्यात दिली आहे. या बेपत्ता विवाहितेचे नाव जन्नतुनीसा जाकीर हुसेन (२५) असे असून तिची उंची ५ फुट ३ इंच, रंग गोरा, बांधा मध्यम, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे, अंगात काळ्या रंगाचा टॉप, पांढऱ्या रंगाची लेगीन्स, पायात काळ्या रंगाची चप्पल घातली आहे. पान २ वर

# पोस्टमनच्या लेकीची यशाला गवसणी

## जिद्दीने बनली चार्टर्ड अकाउंटंट

। नेरळ । प्रतिनिधी ।



स्वप्न पाहायला श्रीमंती लागत नाही, ती साकार करायला जिद्द, चिकाटी आणि आई-वडिलांचा आशीर्वाद पुरेसा असतो. हे नेरळ गावातील एका सामान्य पोस्टमनच्या लेकीने सिद्ध करून दाखवले आहे. भारतीय टपाल खात्यात पोस्टमन म्हणून सेवा बजावणारे बाळकृष्ण दाभणे यांची कन्या सायली दाभणे हिने चार्टर्ड अकाउंटंट परीक्षा उत्तीर्ण करत यशाचे शिखर गाठले आहे. साधं घर, मर्यादित उत्पन्न आणि रोजच्या गरजांची झुंज या सगळ्यातून सायलीचा शैक्षणिकप्रवास सुरू झाला. वडील पोस्टमन म्हणून प्रामाणिकपणे काम करत असताना आई सुनीता दाभणे यांनी संसार सांभाळत मुलीच्या शिक्षणाला खंबीर पाठबळ दिले. 'मुलीचे शिक्षण हेच आमचे भांडवल' या विचारावर ठाम राहत त्यांनी स्वतःच्या अडचणी कधीच पुढे येऊ दिल्या नाहीत. सीए परीक्षेच्या तयारीदरम्यान सायलीसमोर अनेक संकटे उभी राहिली. मात्र, प्रत्येक अपयशाला तिने शिकवण मानली. शिस्त, नियोजन आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीच्या बळावर तिने अखेर यशाला गवसणी घातली.

# नागोठणे परिसराला जामनगर करू

। नागोठणे । प्रतिनिधी ।



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारधारेवर चालणारा पक्ष असल्याने महाराष्ट्राचा विकास हाच राष्ट्रवादी पक्षाचा अजेंडा आहे. याच अजेंड्यावर पक्ष कालही काम करीत होता, आजही करीत आहे व उद्याही करणार आहे. लाडक्या बहिणींना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासह शेतकऱ्यांचे, श्रमजीवी, कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडविण्यासह छ. शिवाजी महाराजांनी ज्या अठरा पगड जातींना स्वराज्यात सामावून घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले, त्या सर्व समाजाच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमी उभा राहिला असून समाजातील त्या सर्व घटकांना विकासात पान २ वर

## अजित पवार यांचे ठोस आश्वासन

### प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन

नगरपंचायतीची प्रस्तावित प्रशासकीय इमारत ही तळा शहराच्या वैभवात भर घालणारी, दर्जेदार आणि भविष्याचा विचार करून उभारण्यात येईल. यामुळे नागरिकांना एकाच छताखाली विविध सेवा-सुविधा उपलब्ध होणार असून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. तळा नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा भूमिपूजन सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तळा येथे संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

**ओहोटीमुळे किनाऱ्यावर वाहून आल्याचा अंदाज | नर प्रजातीच्या कासवाला जीवदान**

# जिल्ह्यात प्रथमच आढळले 'ग्रीन सी' कासव

। अलिबाग । प्रतिनिधी ।



श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला येथील फेरीबोटीच्या नवीन जेट्टीच्या एका बाजूला चिखलावर एक मोठे कासव वाहून आले. याबाबतची माहिती तिथे काम करणाऱ्या आकाश पाडलेकर यांनी दक्षिण कोकण वनविभाग कांदळवन कक्षाच्या कार्यालयाला दिली. त्यानंतर अधिनस्त वनरक्षक, कासव तज्ज्ञ व कासव मित्र यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यावेळी ते ग्रीन सीटर्टल या प्रजातीचे नर कासव असल्याचे लक्षात आले. या कासवाला वनविभाग आणि कासव संवर्धन प्रकल्पाच्या सदस्यांनी जीवदान दिले.

रायगड जिल्ह्यात सागरी क्षेत्रात सागरी कासवांच्या पाच प्रजाती आढळतात, त्या अनुषंगाने या प्रजातीचा त्यात समावेश आहे. परंतु, श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला येथे प्रथमच नर ग्रीन सी कासव वाहून आल्याचे कांदळवन प्रतिष्ठानचे सहाय्यक संशोधक मोहन उपाध्ये यांच्या निदर्शनास आले. या ग्रीन सीटर्टल कासवाचे अंदाजे वजन २०० किलो असून त्याची लांबी १९० सेंमी, पाठीची लांबी ६५ सेंमी, रुंदी ६२.५सेंमी आणि शेपटी ३६ सेंमी इतकी होती. पाण्याला ओहोटी लागल्यामुळे ते किनाऱ्यावर वाहून आले होते. वन कर्मचारी यांनी कासवाची तपासणी केली असता, त्याला कुठेही दुखापत झाल्याचे आढळून आले नाही.

या कासवाला मारळ येथील जयंत कानडे, संकेत मयेकर व हरिहरेश्वर येथील संतोष मयेकर, सुबोध खोपटकर कासव मित्र आणि कांदळवन विभागाचे पान २ वर

# मॅरेथॉन ठरली अखेरची

। तलासरी । वृत्तसंस्था ।



पालघर जिल्ह्यातील गुजरात सीमेवरील तलासरी तालुक्यात एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. वेवजी येथील एका इंग्रजी शाळेत वार्षिक क्रीडा स्पर्धेनिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील शर्यतीनंतर अवघ्या काही वेळातच एका १५ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. रोशनी गोस्वामी असे या विद्यार्थीनिचे नाव आहे. या घटनेमुळे उंबरगाव व तलासरी तालुक्यात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तलासरी तालुक्यातील वेवजी येथील लोकभारती संस्थेच्या भारती अकादमीमध्ये शनिवारी (दि.३) वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेअंतर्गत मॅरेथॉन शर्यत घेण्यात आली. या शर्यतीत दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या रोशनी गोस्वामी हिने भाग घेतला आणि तिने तिसरा क्रमांकही पटकावला. मात्र, विजयाचा आनंद साजरा करण्यापूर्वीच काळाने तिच्यावर झडप घातली. शर्यत पूर्ण केल्यानंतर काही वेळातच तिला धाप लागली. ती मैदानावर खाली बसली आणि बेशुद्ध पडली. तिला तातडीने जवळच्या गुजरातमधील उंबरगाव येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर उपचार सुरू पान २ वर

> माझ्या मुलीला काहीही झाले नव्हते. ती सकाळी नियमित वेळेवर उठली. घरात स्वयंपाक केला आणि भावाला जेवणाचा डबा दिला. स्वतः नाश्ता केल्यानंतर तिने मॅरेथॉनला जाते म्हणून सांगितले आणि दुपारी मला शाळेकडून माझ्या मुलीच्या मृत्यूची बातमी देण्यात आली.
>
> -सुनीताबेन गोस्वामी, रोशनीची आई

# भाजपात मुख्यमंत्र्यांविरुद्ध गट सक्रीय

## नाना पटोल यांचा गौप्यस्फोट



। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असून भाजपने निवडणुकांपूर्वीच ४४ नगरसेवक जिंकले आहेत. कारण, कल्याण डोंबिवलीसह काही महापालिकेत भाजप महायुतीचे जवळपास ६८ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. त्यावरुन विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली असून मनसेने न्यायालयात धाव घेण्याची तयारी दर्शवली आहे. त्याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते तथा आमदार नाना पटोले यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना, भाजपमध्ये मुख्यमंत्र्यांविरुद्ध गट सक्रीय झाला आहे, असे म्हणत सुधीर मुनगंटीवार यांच्या नाराजीवर देखील त्यांनी भाष्य केले आहे.

राज्यातील महापालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडणुका झाल्याने निवडणूक आयोगाने यु-टर्न घेतला आहे, आधी चौकशी करू असे ते म्हणाले होते. आता, आयोगाने वेगळी भूमिका घेतली आहे. राज्याचे निवडणूक आयुक्त भाजपचे कार्यकर्ते असल्यासारखे वागत आहेत.

त्यामुळे लोकशाहीसाठी हे घातक आहे, असे म्हणत निवडणूक आयोगावरही त्यांनी जोरदार हल्लाबोल केला. तसेच, शेतकऱ्यांच्या कर्जावरील स्टँप ड्युटी माफ करण्याच्या निर्णयावरूनही नाना पटोले यांनी टीका केली. निवडणुकीच्या तोंडावर केलेली ही घोषणा आहे, ही कर्ज घेण्याची वेळ नाही, आधी घोषणा केली असती तर फायदा झाला असता, महसूलमंत्री मुनगंटीवार यांचे काय सुरू आहे, ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माहित आहे. भाजपमध्ये भविष्यात स्फोट होईल, मुख्यमंत्री विरोधात गट सक्रीय झाला आहे. कुणाला जर याचे वाईट परिणाम भोगावे लागत असतील तर ते शेतकऱ्यांना भोगावे लागत आहेत, असे गौप्यस्फोटही नाना पटोले यांनी केला आहे.

## पान १ वरून

### नोकरी लावण्याच्या बहाण्याने फसवणूक

लेटर अशी विविध बनावट कागदपत्रे तयार करून ती वेगवेगळ्या बनावट ई-मेल आयडीद्वारे कुरेशी यांना पाठवली. त्यानंतर मार्च ते डिसेंबर २०२४ या कालावधीत टप्प्याटप्प्याने ऋषभने कुरेशी यांच्याकडून एकूण ३२ लाख ८ हजार रुपये उकळले. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही नोकरी मिळाली नाही. संशय आल्याने कुरेशी यांनी कागदपत्रांची तपासणी केली असता ती सर्व बनावट असल्याचे निष्पन्न झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कुरेशी यांनी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून, वापरलेली बनावट कागदपत्रे, ई-मेल आयडी तसेच आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### जिल्ह्यात प्रथमच आढळले 'ग्रीन सी' कासव

अधिनस्त वनरक्षक तुषार बाप्पासाहेब भटे, ऋषिकेश लव्हटे, कासव तज्ज्ञ मोहन उपाध्ये, स्थानिक ग्रामस्थ आणि फेरी बोटीवर काम करणाऱ्या मुलांच्या साहाय्याने नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. अशा प्रकारचे नर ग्रीन सी टर्टल कासव पहिल्यांदाच रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीला लागले. यापूर्वी आसपासच्या किनाऱ्यावर किंवा खाडीत ग्रीन सीटर्टलच्या माद्या आढळल्या आहेत. परंतु, नर कासव सापडले अथवा आढळले अशी ही पहिलीच घटना रायगड जिह्यातील बागमांडला येथे घडली आहे. अशाप्रकारे समुद्री कासव आढळल्यास त्वरीत कांदळवन विभागास कळविण्यात यावे, असे आवाहन विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग, दक्षिण कोकण श्रीमती कांचन पवार यांनी केले आहे.

### नागोठणे परिसराला जामनगर करू

सामावून घेण्याचे काम पक्षाने केले आहे. विकासाच्या बाबतीत रायगड कुठेही कमी पडणार नसून नागोठणे परिसरालाही जामनगर सारखे करण्यासाठी, येथे रोजगार निर्मिती करण्यासाठी मी स्वतः अंबानीजवळ बोलेन, असे ठोस आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी नागोठणेकरांना दिले.

नागोठण्यातील आठवडा बाजार मैदानावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीर मेळावा व प्रवेश सोहळा सोमवारी (दि.५) पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले किशोर जैन यांच्या भाषणातील रिलायन्सच्या विस्तारित प्रकल्पाच्या मुद्द्याचा धागा पकडून अजित पवार यांनी नागोठण्याप्रती आपली भूमिका स्पष्ट केली.

यावेळी राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, मा.आ. अनिकेत तटकरे, मुख्य प्रवेशकर्ते किशोर जैन, प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, सरचिटणीस सुरेश मगर यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

### मॅरेथॉन ठरली अखेरची

होण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. विद्यार्थिनीला हृदयविकाराचा झटका आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच, शाळा व्यवस्थापकांवर कारवाई करण्याची मागणी पालकांनी केली आहे. याप्रकरणी घोलवड पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

### आदीवासी वाडीला 'लंपी'ने ग्रासले

वाडी आणि अन्य वाड्यांमध्ये जनावरांना लंपीने ग्रासले असताना त्या जनावरांची या आजारापासून सुटका करावी, यासाठी कोणत्याही उपाययोजना पशुसंवर्धन विभागाकडून केल्या जात नाहीत. त्याचवेळी या आदिवासी वाड्यापासून २ किलोमीटर अंतरावर चिंचवली येथे पशुवैदयकीय दवाखाना आहे. तरीदेखील पशुवैद्यकीय अधिकारी जनावरांच्या तपासणीच्या कामी पोहचत नाहीत, ही खेदाची बाब असल्याचे आदिवासी शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. लंपी आजाराने त्रस्त असलेल्या जनावरांचे मालक असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांनी आपली व्यथा शासन दरबारी सांगितली आहे; तरीदेखील पशुवैद्यकीय अधिकारी घटनास्थळी पोहचत नाहीत. ही खेदाची गोष्ट असून शासनाने अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आदिवासी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष मालू निरगुडे यांनी केली आहे.

### विवाहिता मुलांसह बेपत्ता

तसेच, ती हिंदी व भोजपुरी भाषा बोलते. तिच्याजवळ रेडमी कंपनीचा मोबाईल फोन आहे. सोबत मुलगा फिरोज जाकीर हुसेन (८) व समीर जाकीर हुसेन (४) यांना घेऊन गेली आहे. या तिघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा पोहवा रामचंद्र घागरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


#### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. नितु झा व श्री. रमेश कुमार झा यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कळंबोळी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेती जमीन मिळकत सर्व्हे नं ५३/५४ एकुण ०.०५.१२ गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ६/०१/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

#### जाहीर नोटीस

तमाम लोकांना सदर नोटीस द्वारे कळविणेत येते की स.नं. ५, पालीखुर्द, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांसी क्षेत्र ४६ आर ही जमीन श्री. जगन्नाथ मुळ्या शेळके, मुक्ताबाई गोपाळ पाटील व भुरीबाई दशरथ पाटील यांचे मालकी हक्क व वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशील श्री राजेश शंकरलाल काकाणी रा. वाशी, नवी मुंबई यांना संपूर्ण मोबदला स्विकारून दि. ०३/०१/२००८ रोजीचे नोंदणीकृत ताबे साठेखतान्वये विक्री केली आहे. सदर दस्त हा सब रजिस्टार पनवेल-३ यांचेकार्यालयात अ.क्र. १४४/२००८ अन्वये नोंदविला आहे.

सदर मिळकतीबाबत तिऱ्हाईत इसमांनी बनावट कुलमुखत्यारपत्राचे आधारे बनावट दस्त करून खरेदी विक्री व्यवहार केल्याचे आमचे अशीलांचे निदर्शनास आले आहे. हेमंत रामचंद्र डाके, केशव बंडू गवते रा. पनवेल यांनी बनावट कुलमुखत्यारपत्राचे आधारे सदर मिळकत दिपक चतरलाल मेहता रा. पनवेल व महावीर कुमार चोरडीया रा. वाशी, नवी मुंबई यांना परस्पर विक्री केली. सदर मिळकत वर नमूद दिपक चतरलाल मेहता व महावीर कुमार चोरडीया यांनी ललितकुमार चंडालिया रा. पनवेल यांना विक्री केली. सदर बनावट कुलमुखत्यारपत्रा बाबत तहसील कार्यालयात चौकशी केली असता सदर कुलमुखत्यारपत्र हे सदर कार्यालयात नोंदविले नसून ते बनावट असलेबाबत माहिती तहसील कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

सदर कुलमुखत्यारपत्रावरील जमीन मालकांच्या सहया बनावट असून तहसील कार्यालयाचे शिक्के, सहया पण बनावट आहेत. तसेच या बनावट कुलमुखत्यार पत्राचे आधारे हेमंत रामचंद्र डाके, केशव बंडू गवते रा. पनवेल यांनी मा. उपविभागीय अधिकारी, पनवेल यांची दिशाभूल करून शेत जमीन खरेदी विक्री व्यवहारास परवानगी पण मिळवली आहे. या सर्व बेकायदेशीर कृत्यांबाबत वरील इसमांविरूद्ध योग्य ती फौजदारी कार्यवाही करणेबाबत पोलीस तसेच मुंबई उच्च न्यायालय येथे आमचे अशील दाद मागणार आहेत. दरम्यानचे काळात सदर मिळकत विक्री बाबत काही व्यवहार होवून अजून कोणाची फसवणूक होवू नये म्हणून प्रस्तुतची नोटीस दिली आहे. तरी सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी. जर कोणीही यापुढे या सदर मिळकतीबाबत वर नमूद इसमांबरोबर व्यवहार केला तर अगर केला असल्यास त्याचे होणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांची व खर्चाची जबाबदारी त्यांचेवर राहील व कोणाचीही कोणतीही तक्रार किंवा म्हणणे नंतर ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घेणेत यावी.

दिनांक : ०६/०१/२०२६
ठिकाण : पनवेल

**एस. बी. झंवर**
**(ॲडव्हाकेट)**
१२२६/ए, शुक्रवार पेठ, सुभाषनगर कॉलनी,
विवेक अपार्टमेंट, पुणे ४११००२, मो. ९४२२००८६०८

#### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मालेगांव तर्फे वरेडी ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| गुरुनाथ आण्णा निमणे | ७३ | ३ | १-६४-० चौ.मी. | १६.४० |
| | ७३ | ४ | ३-०५-० चौ.मी. | ३०.५० |
| अशा मिळकतीवर असलेले दहिवली तर्फे वरेडी ग्रामपंचायत घर मिळकत क्रमांक १०१२ सहीत | | | | |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

#### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे कळंबोली, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| संपत पांडुरंग हडप | १४ | ३/अ | ०-११-९० | ०.१२ |

वर वर्णन केलेली शेतजमिन मिळकतींच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील शेतजमिन मिळकतींशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येउन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०५/०१/२०२६

अधिवक्ता
**स्वप्नील बाबुराव देशमुख**
ऑफिस पत्ता :- शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा
मुद्रे खुर्द, ता. कर्जत जि. रायगड
मो.नं. ७६६६४५६९९४/७०३८३४८१३९
९०२८५५६४४७/९३७१८९९९५६

वकील श्री सिध्दार्थ विश्राम जाधव

#### जाहीर नोटीस

चौकशी अर्ज क्र. १६८/२०२५ — निशाणी क्र.

**सौ. शीतल अश्विन गायकवाड**
वय :- ४५ वर्ष, व्यवसाय डॉक्टर,
राहणार :- सदनिका क्र.१०३, प्लॉट नं. २८,
स्वस्तिक विना को ऑप हौसिंग सोसायटी लि.
सेक्टर-२४,जुईनगर,सानपाडा, नवी मुंबई,
तालुका + जिल्हा- ठाणे - ४०० ७०६. ... अर्जदार
विरुद्ध
निल ... सामनेवाले

वरील अर्जदार यांची आई श्रीमती माधवी माधव माने दिनांक ०५/११/२०२० रोजी नवी मुंबई येथे मयत झाले आहेत, सदर मयत व्यक्तीच्या नावाने खालीलप्रमाणे मालकीची व संयुक्त मालकीची मिळकत आहे.

१) जमीन, गट नं. १२८, मु. पोस्ट- मांडला, तालुका - मुरुड, जिल्हा - रायगड.
२) जमीन, गट नं. १२८/७, मु. पोस्ट- मांडला, तालुका - मुरुड, जिल्हा - रायगड.
३) जमीन, गट नं. १०४, मु. पोस्ट- मांडला, तालुका मुरुड, जिल्हा - रायगड.
४) जमीन, गट नं. ४१, मु. पोस्ट- भोईघर, तालुका मुरुड, जिल्हा - रायगड.
५) सदनिका क्र.ए-५०३, ५ वा मजला, प्लॉट नं. २३६-२३७, न्यू लुक को ऑप हौसिंग सोसायटी लि., एम.एम.जी.एस मार्ग नायगाव, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.

क्षेत्रफळ : ३००.०० चौ. फूट, (५०% मालकी हक्क )

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचा असेल आणि वरील मालकीची व संयुक्त मालकीच्या मिळकतीच्या वारासदाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वत: हजर होऊन दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू कोर्ट, वरील अर्जदार यांना सदरहू मिळकतीचे मयताचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज दिनांक ०१ डिसेंबर २०२६ रोजी माझे सहीने दिले.

सही/-
लिपिक
दिवाणी न्यायालय अलिबाग,
अलिबाग, जिल्हा - रायगड.

हुकुमावरून
सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर

#### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. बाळु माणिक पाटील यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. हेमंत शरद पुरंदरे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ११२ | ४ | १-८०-०० पो.ख. ०-०६-०० | १-६९ |
| यापैकी श्री. हेमंत शरद पुरंदरे यांचे मालकीची व हिश्याची ०-२५-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत विकत देणेचे ठरले आहे. | | | |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०६/०१/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

#### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे दामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पा | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अब्दुल्लाह अब्दुलहक खान | ३८ | १ब | ०-१३-७ | ०.१६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

#### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे अंजप ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| स्मिता अजय पिंपळे व इतर | ९६ | १ | ३४७ चौ.मी. | ३४.७० |
| | ९६ | १६ | २८८ चौ.मी. | २८.८० |
| | ९६ | १७ | ३४३ चौ.मी. | ३४.३० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

#### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्रीमती पुर्णिमा भालचंद्र चव्हाण राहणार श्रीबाग नं.२, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या खालील नमुद मिळकतीचे मालकी हक्कांबाबत (टायटल क्लिअरन्स) शोध घेण्याकरिता व त्या मिळकती संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| खंडाळे ता.अलिबाग | ३०८ | जिरायत ०-०७-८० पो.खराबा ०-०१-३० एकुण ०-०९-१० | ०२.०० |

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाच्याही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणे येणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढिल १० (दहा) दिवसांचे मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन मालकी हक्काबाबत दाखला देण्यात येईल व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

तालुका : अलिबाग
दिनांक : ०६/०१/२०२६

सही /-
**ॲड श्री. अमित महेश्वर देशमुख**
ता. अलिबाग जि. रायगड

#### रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या. अलिबाग

नोंदणी क्रमांक : के.बी.ए.बी.एन के १०४
जा.क्र.२/नैमि. रिक्त पदे/संचा.स./अ. अ.नि./२०२५-२६ दि.०५/०१/२०२६

**सभेची नोटीस**

रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या.अलिबाग जि.रायगड या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नियम ७४ मधील तरतूदीनुसार आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदार संघ (४) पदे व महिला संघ (१) पद या दोन प्रवर्गातील/मतदारसंघातील रिक्त झालेल्या ५ संचालक पदांच्या निवडीकरीता मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालयाकडील दि. २४/१२/२०२५ रोजी जा.क्र.२५२८/ जिउनि/कात-५/राजिपकर्म.पत/संचालक निवड/अ.अधि.नि./२०२५ अन्वये संचालक निवड सभेसाठी प्राधिकृत केलेले अध्यासी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नटराज प्रिमायसेस, दुसरा मजला, सुमंगल हॉटेलच्यावर, पी.एन.पी. नगर, अलिबाग जि. रायगड या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व संचालकांनी सदर सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सदर सभेत नैमित्तिक रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | सकाळी११.०० ते दुपारी ११.४५ |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | दुपारी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्धी | दुपारी १२.४५ |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी १.०० ते दुपारी १.३० |
| ५ | अंतिम उमेदवाराची यादी जाहिर करणे | दुपारी १.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी २.०० ते संपेपर्यंत |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी २.३० ते संपेपर्यंत |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे | मतमोजणी झाल्यानंतर लगेच |

टिप - निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

दिनांक :- ०५/०१/२०२६
ठिकाण :- अलिबाग

सही/-
**(अनिल पवार)**
अध्यासी अधिकारी
**रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या.अलिबाग**
**तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अलिबाग- रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्रं. अपिल/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/६२६/२०२५ — दिनांक :- ११/१२/२०२५

**जाहिर सुचना**
प्रति,
१. सौ. भावना पंकज भानुशाली
रा.९०८,एल.व्ही.अपार्टमेंट, हिमालय
सोसायटी घाटकोपर (प) मुं. ... अर्जदार
विरूद्ध
१. श्री. लक्ष्मण रामभाउ मानकर
२. श्रीम. अश्विनी अशोक मानकर
३. श्रीम. अस्मिता अशोक मानकर
४. श्री. संदीप रामभाउ मानकर
५. श्री. अश्विनी अनिल शिंदे
६. श्रीम. सुर्वणा मंगेश देशमुख
७. श्रीम. अपर्णा राजेंद्र जाधव
८. श्री. राजु विठोबा मानकर
९. श्रीम. मंदाबाई विठोबा मानकर
१०. श्रीम. सविता विठोबा मानकर
११. श्रीम. संगिता विठोबा मानकर
१२. श्रीम. रेखा विठोबा मानकर
१३. श्रीम. रंजना विठोबा मानकर
१४. श्रीम. सुनिती चंद्रकांत कडु
१५. श्री. अजय प्रतापभाई शहा
१६. श्री. महेंद्रकुमार वालाप्रसाद जैसवाल
सर्व रा. बोंडशेत ता. माणगांव जि. रायगड .. सामनेवाले

विषय:- अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद/अपिल नं.२७९/२०२३ मध्ये दि. २१/०३/२०२५ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील फेरतपासणी अर्जाची सुनावणी (विलंबाच्या व दाखल करुन घेण्याच्या मुद्यावर) मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १३.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
नायब तहसिलदार (अपिले)
आयुक्त, कोकण विभाग

#### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक श्री. अभय पुरूषोत्तम म्हात्रे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी उभयतांनी बोलणी केलेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र व उपविभाग | क्षेत्र | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पेझारी ता.अलिबाग | ६५ | ०-१५-६० ०-०१-०० ०-१७-५० | ०.९५ |
| वर वर्णन केलेली मिळकत सदर जाहिर नोटीसचा विषय आहे. | | | |

सदर वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे तसेच जाणे येणे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाच्या बाबत कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत लेखी स्वरूपात नोंदवावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहुन येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग.
दिनांक : ०५/०१/२०२६

सही/-
**ॲड. कांचन प्रशांत नार्वेकर**
फ्लॅट नं. १०६, ॲकॉन क्लासिक,
जिल्हा न्यायालयाचे समोर
ता.अलिबाग, जि. रायगड

#### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे किरवली, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक सुलोचना रामदास निकम यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ. मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ७३ | २ | ३४८-३७ | ३४-८४ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०६/०१/२०२६
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

#### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. मेहुल प्रवीण शाह यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णनः**
**मौजे. कलोते मोकाशी, ता. खालापूर, जि. रायगड**

| सर्वे नंबर हिस्सा नंबर | आर.चौ. मीटर. चौ सें.मी. | आकार रूपये पैसे |
|---|---|---|
| ५०९ | अकृषित क्षेत्र ५८.००.०० | ११६०.०० |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांकः ६ जानेवारी २०२६

**ॲड. सुमित साहेबराव साबळे**
पत्ताः शॉप नंबर ३, तळ मजला,
साई विला अपार्टमेंट, सम्राट नगर,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ७७१९९४४५५८/ ८१४९२३६७६५

#### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक १) श्री गौतम हिराजी पाटील विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पावसाळवाडी ; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| ८५/४ | ०-४९-१० | ४-०३ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ०६/०१/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
पत्ता-जांभूळपाडा तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

# निवडक



## सोन्याचे दागिने चोरणाऱ्यांना बेड्या

**पनवेल :** महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचणाऱ्या तीन अट्टल चोरट्यांना गुन्हे शाखा कक्ष ०३, पनवेल यांनी अटक करून त्यांच्याकडून चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये काही अनोळखी आरोपी हे मोटारसायकलवरून भरधाव वेगाने येऊन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे किमती व मौल्यवान दागिने जबरीने खेचून जबरी चोरी करत असल्याबाबत अनेक गुन्हे दाखल आहेत. अशा गंभीर गुन्ह्यांची तात्काळ उकल करण्याबाबत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह. पोलीस आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार तीन आरोपींना अटक केली आहे.



## शिक्षिकांनी घेतला चित्रपटाचा आनंद

**पनवेल :** महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे, ज्ञानमंदिर कळंबोली विद्यालयातील स्त्री शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त. के.के. सिनेमा कामोठे येथे क्रांतीज्योती विद्यालय हा चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला. महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले होते, त्यांच्या जयंतीनिमित्त हा चित्रपट पाहण्याचा आनंद शिक्षिकांनी लुटला. चित्रपट पाहण्यासाठी एकत्रित आलेल्या सावित्रीच्या लेकींनी सावित्रीबाई फुले यांच्या आदर्शांना उजाळा दिला आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा घेतली.



## साहित्य संमेलनात रायगडच्या 'नायाब' गझलांचा डंका

**माणगाव :** सातारा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात रायगड जिल्ह्याचे सुप्रसिद्ध गझलकार प्रा.नागेश नायडू (नायाब) यांनी आपल्या धारदार लेखणीने आणि खणखणीत सादरीकरणाने गझल कट्टा गाजवला. सामाजिक विषमता, लोकशाहीची घसरण आणि मानवी वेदना यांवर परखड भाष्य करणाऱ्या त्यांच्या आशयघन गझलांनी रसिक श्रोत्यांच्या मनावर खोल ठसा उमटवला. रायगड जिल्ह्यातील इंदापूर येथील कै. द. ग. तटकरे कनिष्ठ महाविद्यालयात रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रा. नागेश नायडू गेली २५ वर्षे अध्यापनाचे कार्य करत आहेत. 'नायाब' या तखल्लुसाने त्यांनी मराठी गझलविश्वात स्वतःची स्वतंत्र आणि ठळक ओळख निर्माण केली आहे. साताऱ्याच्या गझल कट्ट्यावर सादर झालेल्या त्यांच्या गझलांनी उपस्थितांना अंतर्मुख केले. बदलत्या काळातील विसंगती अधोरेखित करताना त्यांनी सादर केलेला शेर विशेष लक्षवेधी ठरला. आयुष्याचा पेपर म्हणजे चकवा असतो, उत्तर लिहिता प्रश्न अचानक बदलून जातो''. गरिबी आणि भुकेचे विदारक वास्तव मांडणाऱ्या खालील ओळींना रसिकांनी उभे राहून दाद दिली चंद्र अन् कोजागिरी हे तृप्ततेचे चोचले, भाकरीचा सूर्य गिळण्या अंतराळी चाललो... प्रा. नागेश नायडू हे सातत्याने अखिल भारतीय साहित्य संमेलन, 'एल्गार' मराठी गझल संमेलनसारख्या प्रतिष्ठित व्यासपीठांवर रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांच्या या दमदार सादरीकरणामुळे रायगडच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेचा गौरव झालयाची भावना साहित्यप्रेमींनी व्यक्त केली.

# पोयनाडकर कचऱ्याच्या धुरात

- **ग्रामपंचायत प्रशासनाचा नागरिकांच्या जीवाशी खेळ**
- **डंम्पिंग ग्राऊंडमध्ये कचरा जाळल्याने आरोग्य धोक्यात**



छायाचित्र : जीवन पाटील

### प्रशासन बेजबाबदार

पोयनाड परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही ग्रामपंचायत व जिल्हा आरोग्य विभागाची जबाबदारी आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र पूर्ण ग्रामपंचायत निष्क्रिय ठरत असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाही जिल्हा व स्थानिक प्रशासनाला याबाबत काहीच सोयरसुतक नाही, असेच यावरुन दिसून येत आहे. त्यामुळे या बेजबाबदार प्रशासनाविरोधात नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

**| भाकरवड | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड हे सुमारे १६० गावांना जोडणारे प्रमुख बाजारपेठ केंद्र असून, दररोज शेकडो नव्हे तर हजारो नागरिकांची बाजारहाट करण्यासाठी येथे वर्दळ असते. मात्र, या महत्त्वाच्या ठिकाणी नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळणारे प्रकार पोयनाड ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाकडून उघडपणे सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

ग्रामपंचायतीच्या हद्दीत कचऱ्याचे ढीग बिनधास्तपणे टाकले जात असून, त्याची कोणतीही योग्य विल्हेवाट लावली जात नाही. विशेष म्हणजे, पोलीस ठाण्याच्या अगदी शेजारीच असलेल्या डम्पिंग ग्राऊंडमध्ये मृत कुत्रे, बकऱ्या फेकल्या जात असून, हा कचरा २४ तास जाळला जात आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी, घातक धूर आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे.

दरम्यान, हा कचरा डम्पिंग ग्राऊंडच्या अगदी लगतच पोयनाडमधील एकमेव मोठे खेळाचे मैदान आहे. येथे दररोज तरुण मुले सराव करतात तसेच मोठ्या स्तरावरील क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. मात्र, धुराने वेढलेल्या या मैदानात खेळणाऱ्या खेळाडूंच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, प्रशासन मात्र डोळेझाक करत आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.डम्पिंग ग्राऊंडची प्रत्यक्ष पाहणी केली असता परिस्थिती अत्यंत घाणेरडी, धक्कादायक आणि अमानवी असल्याचे स्पष्ट दिसून येते. सतत जळणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ, दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, याच परिसरात डॉ. शिंदे यांचे मोठे रुग्णालय असून, उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांनाही या प्रदूषणाचा मोठा त्रास होत आहे.

सध्या ग्रामपंचायतीत प्रशासक व ग्रामसेवक कार्यरत असतानाही या गंभीर प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. १६० गावांतील लोकांची वर्दळ असलेल्या बाजारपेठेच्या मध्यभागी आणि एकमेव खेळाच्या मैदानाच्या शेजारी असे बेजबाबदार कचरा व्यवस्थापन म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळण्यासारखेच आहे. तात्काळ कचरा हटवून योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी, डम्पिंग ग्राऊंड अन्यत्र हलवावे व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी संतप्त नागरिकांकडून केली जात आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# लिंग समता, स्त्री आरोग्यावर थेट संवाद

### तटकरे महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम उत्साहात



**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालय, माणगावरायगड येथील महिला विकास कक्षाच्या वतीने 'समता संवाद यात्रा, कोकण' अंतर्गत लिंग समता व स्त्री आरोग्याविषयी जनजागृती कार्यक्रम दि. २ जानेवारी रोजी अत्यंत सकारात्मक व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिपुरकर विद्यालयाचे चेअरमन अरुण पवार हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'समाजबंध' या संस्थेचे विश्वस्त सचिन आशा सुभाष व शर्वरी सुरेखा अरुण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुण्या साहित्यिक सुरेखा दांडेकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. समाजातील जात, धर्म व लिंगावर आधारित असमानता दूर करून मूल्याधारित जीवनदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सुरू करण्यात आलेल्या समता संवाद यात्रेच्या माध्यमातून युवकांशी थेट संवाद साधत सामाजिक समता, स्त्री–पुरुष समानता, स्त्री आरोग्य, मासिक पाळी व्यवस्थापन तसेच दैनंदिन आयुष्यात मूल्याधारित वर्तनाचे महत्त्व यावर प्रभावी प्रबोधन करण्यात आले. सत्यशोधक कार्यकर्ते सचिन व शर्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या संवादात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत सामाजिक समतेची संकल्पना, पुरोगामी विचारांची गरज, तसेच समाज परिवर्तनात युवकांची जबाबदारी व भूमिका यावर सखोल चर्चा करण्यात आली. नव्या पिढीला पुरोगामी विचारांशी जोडून सामाजिक भान निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी शेलार यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. अंकिता म्हस्के यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. वृषाली सालस्कर यांच्यासह प्रा. अंकिता म्हस्के, प्रा. आयेशा बडे, प्रा. अश्विनी शेलार, प्रा. तेजस्विनी आचार्य, प्रा. नाझिया जुम्मल, प्रा. श्वेता सकपाळ, प्रा. अमरीन अडकर यांनी परिश्रम घेतले. तसेच विद्यार्थी प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग लाभला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, त्यामुळे हा उपक्रम सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी ठरला.

# १६ वकील निवडणुकीच्या रिंगणात

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत कायद्याची पदवी घेतलेले आणि प्रत्यक्ष वकिली व्यवसाय करणारे तब्बल १६ वकिल उमेदवार विविध प्रभागांतून निवडणूक रिंगणात उत्तरले आहेत. त्यामुळे भविष्यात पनवेल महापालिकेत कायदेशीर जाण असलल्या लोक प्रतिनिधींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली ग्राह्य जात आहे.

यंदा सर्वाधिक लक्षवेधी प्रभाग म्हणजे प्रभाग क्रमांक १७ येथे तब्बल चार वकील थेट आमनेसामने असून प्रचार अधिक तर्कशुद्ध, मुद्देसूद आणि कायदेशीर भाषेत सुरू असल्याचे चित्र आहे. या प्रभागात पनवेल बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, माजी नगराध्यक्ष सुनील घरत यांच्या कन्या ॲड. शिवानी घरत, भाजपकडून ॲड. प्रकाश बिनेदार तसेच कपबशी चिन्हावर अपक्ष म्हणून निवडणूक लढवणारे ॲड. जयसिंग शेरे यांचा समावेश आहे.

कामोठे परिसरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये शेतकरी कामगार पक्षाकडून ॲड. सिद्धार्थ सोनाजी इंगळे (शिट्टी चिन्ह) यांनी भाजपचे उमेदवार प्रभाकर कांबळे यांना थेट आव्हान दिले आहे. याच प्रभागात ॲड. सुलक्षणा जगदाळे हेलिकॉप्टर चिन्हावर अपक्ष म्हणून मैदानात उतरल्या आहेत. प्रभाग क्रमांक ६ मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग या जागेवर भाजपकडून माजी नगरसेवक ॲड. नरेश ठाकूर निवडणूक लढवत असून, महापालिकेतील अनुभव आणि कायदेशीर पार्श्वभूमी हे त्यांचे प्रमुख भांडवल आहे. याच प्रभागात सर्वसाधारण महिला गटातून ॲड. गीता सुशील चौधरी सफरचंद चिन्हावर अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. प्रभाग क्रमांक ७ मध्ये जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अनिता पाटील व ज्येष्ठ नेते आत्माराम पाटील यांच्या कन्या ॲड. विणा पाटील मैदानात असून, त्या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करत आहेत.

प्रभाग क्रमांक ८ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील यांचे पुत्र ॲड. तुषार पाटील तुतारी चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. याशिवाय प्रभाग क्रमांक ९ मधून भाजपच्या ॲड. प्रतिभा सुभाष भोईर, प्रभाग ११ मधून ॲड. समाधान काशीद, प्रभाग १३ मधून अपक्ष ॲड. संतोष गाडी, तसेच प्रभाग १८ व १९ मधून अनुक्रमे ॲड. सिद्धार्थ गावकर आणि ॲड. राहुल कासारे हे उमेदवार रिंगणात आहेत.

# 'नोटा' असताना बिनविरोध कसे?

**| उरण | प्रतिनिधी |**

महाराष्ट्रातील महानगर पालिकांच्या निवडणुकांमध्ये सुमारे ६५ नगरसेवक व नगरसेविका बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर झाल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. 'नोटा' हा घटनात्मक पर्याय अस्तित्वात असताना अशा प्रकारे बिनविरोध निवडी जाहीर करणे म्हणजे मतदारांच्या मूलभूत अधिकारांवर घाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी यासंदर्भात मुख्य निवडणूक आयुक्तांकडे लेखी हरकत नोंदवली आहे.

# तीन हजारांच्या कपड्यांसाठी मोजले एक लाख ३२ हजार

**| पनवेल | प्रतिनिधी |**

वेबसाइटवरून ऑनलाइन ड्रेस मागवणे एका महिलेला चांगलेच महागात पडले आहे. पनवेलच्या करंजाडे भागात राहणाऱ्या या विवाहितेने ज्या ऑनलाइन साइटवरून ड्रेस खरेदी केले, त्या बोगस साइटवरील सायबरचोरांनी तिला फसवले. ड्रेस घेऊन निघालेल्या डिलीव्हरी बॉयचा अपघात झाल्याचे सांगून त्यांना पैसे परत पाठविण्याचा बहाणा करून या महिलेकडून १ लाख ३२ हजार रुपये उकळण्यात आले.

सदर महिला इन्स्टाग्रामवरील रिल्स बघत असताना, आयेशा क्रिएशनच्या पेजवर स्वस्तात कपडे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे तिने पाहिले. जाहिरातीत दिलेल्या क्रमांकावर या महिलेने संपर्क साधला असता ३ हजार ६०० रुपयांत शिलाईसह दोन ड्रेस मिळतील, असे सांगण्यात आले. त्यामुळे या विवाहितेच्या पतीने ड्रेस खरेदी करण्यासाठी पाठवण्यात आलेल्या स्कॅनरवर ३ हजार ६०० रुपये पाठवून दिले. मात्र त्यांचे ड्रेस घेऊन निघालेल्या डिलीव्हरी बॉयचा अपघात झाल्याचा मेसेज पाठवून सायबर चोरांनी त्यांची रक्कम परत करण्याचा बहाणा केला. तसेच गुगल पेवर रिक्वेस्ट स्वीकारण्यास सांगितले. त्यानुसार या महिलेच्या पतीने ही रिक्वेस्ट स्वीकारल्यानंतर त्यांना पैसे तर आले नाहीच, उलट पतीच्या खात्यातून ९३ हजार रुपये गेले. त्यानंतर आयेशा क्रिएशनचे मालक असल्याचे भासवून या महिलेशी संपर्क साधला. मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे सांगितले. तसेच त्यांना आणखी ३० हजार, त्यानंतर आणखी ५,२९८ रुपये पाठविण्यास सांगून फसवले.

आंबेवाडी ते निवी कालव्याची कामे युद्धपातळीवर | प्रशासन दक्ष, नागरिकांत सकारात्मक भावना

# जानेवारीअखेरीस शेतकऱ्यांना मिळणार पाणी



**| रोहा | प्रतिनिधी |**

तब्बल दहा ते बारा वर्षे रखडलेला आंबेवाडी ते निवी हद्दीतील कालवा दुरुस्तीचे काम सध्या युद्धपातळीवर सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वरदान ठरलेला कालवा पूर्वपदावर यायला प्रारंभ झाला आहे. कालवा दुरुस्तीवर पाटबंधारे विभागाने आतापर्यंत करोडो रुपयांचा निधी खर्च केला. विभागातील तिसे, वाशी, लांढर, निवी,तळाघर हद्दीतील नादुरुस्त मोठे सायपन, एस्कॅप नव्याने केले. अनेक ठिकाणचे ब्रिज (साकव) झाले. कालव्याची लायनिंग कामे, ठिकठिकाणच्या दुरुस्तीची कामे पाहता युद्धपातळीवर काम सुरू असल्याचे अधोरेखीत झाले.

कालवा दुरुस्तीबाबत मागील दोन तीन वर्षे कोलाड पाटबंधारे प्रशासन मुख्यतः संबंधित अधिकारी एकदम दक्ष असल्याचे दिसत आहे. गाव हद्दीतील एस्कॅप, मायनरची कामे दर्जेदार होत असल्याने परिसरातील नागरिकांत सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. शनिवारी रात्री रस्त्याखालील जुने पाईप बदलून नवीन टाकण्यात आले. सहा. कार्य. अभियंता श्वेता चिचुळकर, सहा. अभियंता रत्नदीप वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली कालवा निरीक्षक निलेश दिसले व टीमने हे काम पूर्ण केले.

> **कालवा दुरुस्तीचे काम सध्या युद्धपातळीवर सुरु आहे. यातील महत्त्वाची दुरुस्ती कामे जानेवारीअखेरीस पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील. त्यानंतर लगेचच साफसफाई करत पाणी सोडण्याचे प्रयोजन आहे.**
>
> **– मिलिंद पवार, कार्य. अभियंता, पाटबंधारे विभाग, कोलाड**

दरम्यान, या कालव्याच्या पाण्यासाठी, कालवा पूर्वपदावर येण्यासाठी सर्व शेतकरी, नागरिक समावेश बळीराजा फाऊंडेशनच्या लढ्याला अभूतपूर्ण यश आले आहे. तिसे, संभे, आंबेवाडी हद्दीतील काही महत्त्वाची कामे करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. कालव्याची सर्वच कामे पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. निधी अधिक उपलब्ध होणार आहे, अशी माहिती कार्यकारी अभियंता मिलिंद पवार यांनी दिली आहे. त्यामुळे आंबेवाडी ते निवी कालव्याला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास शेतकऱ्यांतून व्यक्त झाला आहे.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# मराठीच्या 'शंभरी'ची चिंता

साताऱ्यात भरलेल्या ९९व्या साहित्य संमेलनात मराठीची शंभरी भरत आल्याची चिंता सर्वत्र पसरलेली असावी हा कोणाही मराठी माणसाला टोचेल असा विरोधाभास आहे. लोकहो वेळीच झोपेतून जागे व्हा अशी हाळी विश्वास पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली. मायमराठीची लढाई प्रत्येकाच्या उंबरठ्यावर येऊन पोचली आहे असेही ते म्हणाले. हे चित्र बदलण्यासाठी नेमके काय करायला हवे आणि खुद्द विश्वासराव त्यात आपली कोणती जबाबदारी उचलणार हे मात्र या अध्यक्षीय भाषणातून कळत नाही. एकीकडे मराठी साहित्य संमेलने खर्चाच्या बाबतीत पाच कोटी, पंचवीस कोटी, पन्नास कोटी असे इमले पार करत असताना खुद्द मराठी भाषेच्या अंगावरची वस्त्रे कुसुमाग्रजांनी आपल्या प्रसिध्द कवितेत वर्णन केल्याप्रमाणे फाटत चालली आहेत. आणखी ५० वर्षांनी मराठी भाषा जगेल का असा प्रश्न सर्वांना सतावू लागला आहे. आजच मुंबईपासून ते तालुक्यांपर्यंतच्या गावांपर्यंत मराठी घरातील मुले सर्रास इंग्रजी माध्यमांच्या शाळात जाऊ लागली आहेत. त्यातून त्यांचे इंग्रजी किती चांगले होते याची कल्पना नसली तरी मराठी लिहिणे वाचणे बंद होत चालले आहे. पुढे नोकरी व धंद्यामध्ये त्यांना त्याची गरजही भासेनाशी झाली आहे. त्यामुळे मराठी म्हणजे कुटुंबात बोलण्याची भाषा इतपतच तिचे स्थान राहील की काय अशी शक्यता दिसते आहे. गेली अनेक वर्षे साहित्य संमेलनांचे अध्यक्ष दरवर्षी आपल्या भाषणांमध्ये याबाबत तीच ती चिंता व्यक्त करतात, त्यावर थोडी चर्चा होते व नंतर सर्व शांत होते. यंदाही बहुदा तसेच होईल. मराठीची दुरवस्था होण्याच्या कारणांची थोडी चर्चा पाटलांनी केली आहे. मुंबई व नागपूरमध्ये महापालिकांनीच इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढण्यासाठी घेतलेला पुढाकार, शाळांमधील ग्रंथालये बंद पडणे, एसटी स्थानकांवरील पेपर व पुस्तकांचे स्टॉल्स बंद पडणे इत्यादींचा त्यांनी उल्लेख केला आहे. पण इंग्रजी आली नाही तर आपण जगायला लायक ठरणार नाही ही जी भीती आरपार खोलपर्यंत समाजात गेली आहे तिचे काय करणार याचे उत्तर पाटील व त्यांच्यासारखे कोणीच देत नाहीत.

### बंडालाच विरोध

हे बदलणे कठीण आहे, कारण आपला समाजव्यवहारच सडलेला आहे. संमेलनाच्या उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे कोण तर देवेंद्र फडणवीस. याच फडणवीसांनी काही महिन्यांपूर्वी पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याचे धोरण आणले होते. मोठ्या विरोधामुळे त्यांना ते मागे घ्यावे लागले तरी आजही ते याचे समर्थन करतात. काल संमेलनातील भाषणात महाराष्ट्रात फक्त मराठीच सक्तीची आहे असे विधान करून त्यांनी टाळ्या मिळवल्या. पण वस्तुस्थिती याच्या अत्यंत उलट आहे. सीबीएसई वा आयसीएसई शाळांमध्ये आज बहुतांश ठिकाणी मराठी शिकवली जात नाही. तेथे हिंदी मात्र सक्तीची आहे. आपल्याकडे बऱ्याच शाळा आता महाराष्ट्र शालान्त मंडळ सोडून सीबीएसईकडे वळू लागले आहेत. अनेक उच्च मध्यमवर्गीय तर केंब्रिज किंवा सिंगापूरचाच अभ्यासक्रम शिकवू लागले आहेत. फडणवीस यांनी हे रोखण्यासाठी व मराठी सक्तीची करण्यासाठी काहीही केलेले नाही. त्यांची तशी नियतच नाही. किंबहुना, हिंदू, हिंदी, हिंदुस्तान हेच त्यांच्या पक्षाचे धोरण आहे. त्यात तमीळ, बंगाली, मराठी अशा भाषांना आणि म्हणूनच पर्यायाने तेथील स्थानिक राजकारणाला काहीही महत्व नाही. उलट अशा भाषा व असे राजकारण खच्ची कसे होईल हेच भाजपवाले पाहत असतात. आज मुंबईत मराठीच्या रक्षणासाठी ठाकरे बंधू एकत्र आले तर भाजपवाले तेथे हिंदू विरुद्ध मुस्लिम अशी लढाई पेटवण्याच्या मागे आहेत. मुंबईचा महापौर हिंदू मराठी होईल असे सांगणे हा त्याचाच भाग आहे. हे असले नतद्रष्ट राजकारण हिंदू धर्माला तर नख लावणारे आहेच, पण मराठीलाही गाळात घालणारे आहे. काल संमेलनामध्ये पहिल्या दिवशी काळे शर्ट घालून येणाऱ्यांना प्रवेश नाकारला जात होता. साहित्य अकादमीचे पुरस्कारप्राप्त लेखक प्रदीप कोकरे यांनाही याचा फटका बसला. याचे कारण असे की, काळे कपडे म्हणजे निषेध असे भाजपच्या लोकांना वाटते. ज्यांना आपल्याच लोकांची, त्यांनी केलेल्या विरोधाची इतकी भीती वाटते असे राज्यकर्ते हे मराठीचे रक्षण करू शकणार नाहीत. मराठी ही मुळात बंडखोरांचीच भाषा आहे. तिची परंपरा ही बंडाचीच आहे. त्या मराठीच्या राज्यातील ही स्थिती दारुण आहे.

### पाटीलबुवा, तुम्ही म्होरं व्हा

विश्वास पाटलांनी आपल्या भाषणात मुंबईतला हरवत गेलेला मराठी माणूस, गावातला भरडला गेलेला शेतकरी इत्यादींच्या आठवणी काढल्या आहेत. पाटील हे सरकारी अधिकारी होते. आपल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी अशा किती लोकांना न्याय दिला याचीही काही उदाहरणे त्यांनी दिली असती तर बरे झाले असते. पाटील हे वाचकप्रिय लेखक आहेत. आता निदान निवृत्तीनंतर आपली लोकप्रियता पणाला लावून त्यांनी मराठीच्या रक्षणासाठी आंदोलने करणाऱ्यांना शक्य तितकी मदत करायला हवी. मुंबईतल्या मराठी शाळा बंद पाडून तेथे बिल्डरांचे मोठे टॉवर उभे राहत आहेत. याविरुध्द आंदोलने करणाऱ्या दीपक पवार व त्यांच्या सहकाऱ्यांना विश्वास पाटील यांनी सक्रीय पाठिंबा दिला तर त्यांचे बळ वाढेल. साहित्य संमेलनामध्ये साहित्यातील नवे प्रवाह, समीक्षा इत्यादींवर चर्चा व्हावी, नव्या कविता सादर व्हाव्यात अशी अपेक्षा असते. पण आता मराठी भाषेची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, या गंभीर चर्चांऐवजी मराठी वाचवण्याची हाक देणारे एक राजकीय संमेलन इतकेच त्याचे स्वरुप उरले आहे. यामध्येही राजकारणी मंडळी आपली पोळी भाजून घेतात. हजारोंचा जमाव जमत असल्याने भाषणे व प्रसिध्दी मिळवून निवडणूक प्रचारासाठी रवाना होतात. पाटील यांचा लेखक म्हणून एकूण लौकिक पाहता त्यांच्या भाषणात साहित्याविषयी अधिक गंभीर काही ऐकायला मिळेल ही शक्यता नव्हतीच. पण संतपंतांच्या नावांची उजळणी करणे, मराठी इतिहास कसा उज्वल आहे याची शाहिरी पध्दतीने वर्णन करणे हेच ते करतील असा होरा होता व तो खरा झाला. नुकत्याच पुण्यात झालेल्या भव्य पुस्तक प्रदर्शनात विक्रमी खरेदी झाली. पाठोपाठ साताऱ्यातही पुस्तक दालनांमधून बऱ्यापैकी पुस्तके विकली गेली असतील. मात्र यामध्ये स्पर्धा परिक्षांना उपयुक्त ठरतील अशी किंवा शंभर पाककृती अशी पुस्तकेच अधिक विकली जातात असा अनुभव आहे. कथा, कादंबरी, कविता इत्यादींमध्ये नवीन प्रयोग करणाऱ्यांची व ते वाचणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. एकूणच जगभर साहित्य नावाच्या प्रकाराला सिनेमे, ओटीटी, मोबाईलवरची करमणूक यांची स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे गंभीर व वेळ देऊन वाचावे लागणारे असे काही कोणालाही नको असल्याचे चित्र् निर्माण झाले आहे. याला कसे तोंड देणार याची काही चर्चा साहित्य संमेलनांमध्ये व्हावी व त्यातून पुढची दिशा सापडावी अशी अपेक्षा असते. पण हे सगळे जिच्यातून करायचे ती मराठी भाषाच संकटात असल्याने हा पुढचा टप्पा गाठलाच जात नाही. यंदाही तेच घडले.

विचार

# ...तर फसगत अटळ आहे

**बदलत्या काळानुसार जगणे सुकर आणि सुलभ करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य आहे. सर्वसामान्यांच्या आयुष्यातही तंत्रज्ञानाने एक कोपरा व्यापला आहे. मात्र मोबाईल, इंटरनेट, नेट बँकिंग आदींच्या माध्यमातून व्यवहार करताना; तंत्रज्ञानाचा आधार घेताना अनेक धोके समोर असतात. सध्या सायबर गुन्ह्यांची संख्या वाढते आहे. गुन्हेगार फसवणुकीच्या नवनवीन क्लुप्त्या शोधत आहेत. त्याविषयी...**




डॉ. दीपक शिकारपूर

डिजिटल युगात आपले दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात मोबाईल, संगणक आणि इंटरनेटवर अवलंबून आहे. बँकिंग व्यवहारांपासून सोशल मीडियावरील संवादापर्यंत प्रत्येक कृती आता ऑनलाइन होते. अशा वातावरणात सायबर गुन्हेगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. हे गुन्हे माहिती चोरीपासून आर्थिक फसवणूक, सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग, बनावट ओळख वापरून त्रास देणे, मालवेअर हल्ले, फिशिंग अशा अनेक स्वरूपांमध्ये घडतात. तंत्रज्ञान वापरून सायबर गुन्हेगार आर्थिक गुन्हे आणि त्यासाठीचे नवनवीन मार्ग शोधत आहेत. इंटरनेट तंत्रज्ञानाला भौगोलिक सीमा नसल्यामुळे ते उघडकीला आणणे पोलिसांसाठी अवघड ठरते. त्यामुळेच सायबर गुन्हे टाळण्याचे प्रयत्न अधिक महत्त्वाचे ठरतात. तसे म्हटले तर, मोबाइल आणि इंटरनेट ही अत्यंत प्रभावी साधने आहेत. त्यांचे छुपे सामर्थ्य ओळखून डोळसपणे उपयोग केला तर बरीच कामे सहजपणे होतात, खर्च तसेच वेळ वाचतो आणि वापरकर्त्याच्या ज्ञानातही भर पडते. या तंत्राचा वापर करून डिजिटल व्यवसाय करता येतो. पण त्यासाठी सायबर सुरक्षेचा कळीचा मुद्दा लक्षात घेणे जरुरीचे आहे. पूर्वी सुरक्षा केवळ भौतिक गोष्टींची गणली जायची. मात्र आता सायबर सुरक्षेबरोबरच सर्व संगणकीय भांडवलाची तसेच माहितीची सुरक्षादेखील अत्यावश्यक बाब झाली आहे

या चर्चेच्या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम सायबर गुन्ह्यांची वैशिष्ट्ये समजून घेऊ या. जसे की, यात सहभागी असणारा गुन्हेगार कुठूनही कारवाई करू शकतो. पुरावे डिजिटल असल्याने लपवता येतात. अनेकदा पीडित व्यक्तीला गुन्हा घडल्याचे उशिरा कळते आणि मुख्य म्हणजे हे गुन्हेगार आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असतात. आपण पाहतो की, नववर्षाच्या काळात लोक मोठ्या प्रमाणात व्हॉट्स ॲप, फेसबुक, इंस्टाग्रामवर शुभेच्छा संदेश तसेच ग्रीटिंग कार्ड, व्हिडिओ, लिंक शेअर करतात. अशा भावनिक वातावरणाचा फायदा घेणे हे अनेक सायबर गुन्हेगारांचे प्रमुख धोरण असते. विशेषतः फिशिंग लिंक असणारे संदेश अत्यंत धोकादायक ठरतात. अशा संदेशांमध्ये लिंक असते. त्यावर क्लिक करणाऱ्याचा डेटा, ओटीपी (वनटाईम पासवर्ड), बँक तपशील आदी लगेचच चोरी होतो.

बनावट शुभेच्छा वेबपेज ईमेल किंवा व्हॉट्स ॲपवर एक अशी लिंक मिळते. त्यावर क्लिक करताच मोबाईलमध्ये मालवेअर इंस्टॉल होते. सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग प्रकारात शुभेच्छा देण्याच्या नावाखाली काही ॲप डाउनलोड करण्याची विनंती केली जाते. ते ॲप परवानग्या मागून फोनमधील प्रणालीत प्रवेश मिळवतात. क्यूआर कोड स्कॅममध्ये क्यू आर कोडद्वारे बँक खात्यातून पैसे वळते करुन घेतले जातात. असे गुन्हेगार डिजिटल प्रतिष्ठा वाढवण्याचे नवे तंत्र शोधत म्हणतात की, 'हा मेसेज ५० लोकांना पाठवा, तुमचे भाग्य फुलेल', अशा चेनमधून तुमचा डेटा ट्रॅक होऊन पुढील फसवणुकीसाठी वापरला जातो.

या आणि अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे परिणाम केवळ आर्थिक नसतात, तर मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर तसेच अत्यंत गंभीर असू शकतात. जसे की, फिशिंग लिंक किंवा क्यूआर कोडवर क्लिक केल्यास खात्यातून पैसे त्वरित दुसऱ्या खात्यात वळते होतात. अनेकदा पीडिताला कळण्यापूर्वीच खाते रिकामे झालेले असते. फोनमधील फोटो, संपर्क क्रमांक, ईमेल, डॉक्युमेंट्स यांची चोरी झाल्यानंतर हा डेटा ब्लॅकमेलिंग किंवा ओळख चोरीसाठी वापरतात. अकाउंट हॅक झाल्यास गुन्हेगार त्यातून खोटे संदेश पाठवून फसवणूक करतात. त्यावरुन अश्लील छायाचित्र, व्हिडीओ टाकले गेल्यास व्यक्तीची प्रतिमा खराब होते. फसवणूक झाल्यानंतर भीती, अपराधीपणा, मानसिक दबाव तसेच कुटुंबातील तणाव वाढतो. अशा घातपातामुळे संस्थात्मक सुरक्षा भंगाचा मोठा धोकाही लक्षात घ्यायला हवा. जसे की, एखाद्या कर्मचाऱ्याने अशा संदेशांवर क्लिक केल्यास ऑफिस नेटवर्कमध्ये मालवेअर प्रवेश करू शकतो. तसे झाल्यास कंपनीवर रॅन्समवेअरचा हल्ला होऊ शकतो.

दर वर्षी सायबर गुन्ह्यांची पद्धत बदलत असते. नवे वर्ष जवळ आल्यावर त्यांच्या तंत्रात काही नव्या गोष्टी दिसतात. उदाहरणार्थ, एआयच्या मदतीने अगदी नैसर्गिक दिसणारे शुभेच्छा संदेश, आवाज, व्हिडिओ तयार केले जातात आणि एखाद्याला ते खरे वाटतात. नववर्षाच्या शुभेच्छा म्हणून ओळखीच्या व्यक्तीचा आवाज किंवा चेहरा वापरून बनावट व्हिडिओ पाठवला जातो आणि दिलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते. नंतर फसवणूक करणारे बॉट वापरून त्वरित उत्तर देतात आणि विश्वास निर्माण करून संवेदनशील माहिती मागतात. सोशल इंजिनियरिंग तंत्र वापरुन मानसशास्त्रीय पद्धतीने व्यक्तीला आकर्षित करण्याच्या उद्देशानेही भावनिक संदेश पाठवले जात आहेत. तेव्हा फसवणुकीपासून दूर राहण्यासाठी नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी काही सोप्या पण अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींची दखल घ्यावी.

कोणत्याही शुभेच्छा संदेशातील लिंकवर क्लिक करण्यापूर्वी तीन सेकंद थांबा आणि हा संदेश कोणाकडून आला आहे, हा प्रश्न स्वत:लाच विचारा. त्यामध्ये अपेक्षित नसणारी लिंक नसल्याची खात्री करा. संदेशातील भाषा किंवा ऑफर संशयास्पद दिसत असेल तर सावध व्हा. अनोळखी क्रमांक किंवा अचानक संपर्क साधणाऱ्या व्यक्तीकडून आलेल्या शुभेच्छा संदेशांवर विश्वास ठेऊ नका. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या बँक खात्याचा तपशील कधीही शेअर करू नका. कुठल्याही शुभेच्छा संदेशासाठी बँक तपशील विचारला तर ती शंभर टक्के फसवणूकच असते. त्याचप्रमाणे क्यूआर कोड स्कॅन करतानाही कायम सावध रहा. फक्त विश्वसनीय स्त्रोतांमधील क्यूआर कोड स्कॅन करा. कधीही गिफ्ट किंवा लकी ड्रॉसाठी क्यूआर स्कॅन करू नका. मोबाईलमध्ये अँटीव्हायरस आणि सिक्युरिटी कायम अपडेट ठेवा. सिस्टीम अपडेट, अँटीव्हायरस तसेच सुरक्षित ब्राउझर वापरा. नेहमी द्विस्तरीय प्रमाणीकरण वापरा. सोशल मीडिया, ईमेल, बँकिंगमध्ये ही दक्षता पाळायलाच हवी. यात ओटीपीशिवाय लॉगिन होऊच नये, अशी व्यवस्था असते. खेरीज सार्वजनिक वायफाय वापरतानाही सतर्क रहावे. पब्लिक वायफायवर कधीही महत्त्वाची बँकिंग ॲक्टिव्हिटी करू नका.

इतकी काळजी घेऊनही दुर्दैवाने सायबर गुन्हा झाल्यास काय करायचे हेदेखील जाणून घेऊ या. सर्वप्रथम अशा फसवणुकीनंतर त्वरित १९३० या राष्ट्रव्यापी हेल्पलाइनवर संपर्क साधा. सायबर फसवणूक झाल्यास लगेच फोन करुन तक्रार नोंदवा. लगोलग बँक किंवा सेवा पुरवठादाराला तत्काळ कळवा. त्यानंतर सोशल मीडिया अकाउंट रिकव्हर करत पासवर्ड बदला आणि अकाउंट रिपोर्ट करा. नववर्ष हा आनंदाचा, आशावाद निर्माण करणारा सण आहे. मात्र, या उत्साहात सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आज डिजिटल साधने वापरणे अपरिहार्य असले तरी सजगता, सावधपणा आणि माहितीची अचूकता यांचे पालन करणेही अत्यावश्यक आहे. अगदी आदिमकाळापासून पाहिले तरी दिसते की, कोणताही समाज किंवा संस्कृती गुन्हेगारीपासून कधीच पूर्णतः मुक्त नव्हती आणि यापुढेही नसेल. त्यामुळे (कोणत्याही प्रकारच्या) गुन्ह्यांचे स्वरूप आणि मुळात ते का केले जातात याचा विचार (प्रतिबंधक उपायांबरोबर) करावाच लागेल. कुठल्याही घटनेला दोन बाजू असतात. साधे सुरीचे उदाहरण घेतले तरी फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याला इजा करण्यासाठी वापर होऊ शकतो. संगणक, मोबाईल आणि इतर आधुनिक उपकरणांचेही तसेच आहे. जगणे, व्यवहार, उद्योग, व्यापार वेगवान आणि सुलभ करण्यासाठी हे तंत्रज्ञान विकसित तसेच लोकप्रिय झाले. पण यामुळे निर्माण होणारा ई कचरा, सायबर गुन्हे, डिजिटल व्यसनाधीनता यासंबंधीच्या जाणिवादेखील प्रगल्भ व्हायला हव्यात. तरच आपण त्याच्याशी संबंधित धोक्यांपासून दूर राहू शकू.

# एसपींच्या दणक्याने माफिया वठणीवर

प्रमोद जाधव

रायगड जिल्हा पर्यटनासह औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या जिल्हयासह राज्यातील, देशविदेशातील मंडळींची वर्दळ वाढली आहे. याचाच फायदा घेत काही माफियांकडून अंमली पदार्थ तस्करी, मटका जुगार अड्डे चालविण्याची भिती आहे. आंचल दलाल यांनी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी पदभार स्विकारल्यानंतर अवैध धंदयाविरोधात धडक कारवाई सूरू केली. अनेकांविरोधात गुन्हे दाखल करून त्यांना दणका देण्यात आला. पोलीस अधिक्षकांच्या दणक्याने अनेक माफिया वठणीवर आल्याचे चित्र दिसून येत आहे. आज गावागावात एसपींच्या शिस्तीची चर्चा होत आहे.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण व पर्यटन झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पर्यटनासह औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने जिल्हा महत्वाचा ठरत आहे. जिल्हयात लहान मोठे प्रकल्प असून नव्याने अनेक प्रकल्पांची निर्मिती होत आहे. जिल्हयात पर्यटनही वेगात वाढत आहे. पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगाराचे साधन मिळत आहे. मात्र काही ठिकाणी नशा येणारे तसेच अन्य अंमली पदार्थ विक्री, वाहतूक व निर्मितीत वाढ होत आहे.तसेच जास्त पैसे मिळविण्याच्या उद्देशाने काही मंडळी मटका, जुगार सारखे अवैध धंदे चालवितात. या व्यवसायमुळे अनेकांचे कुटूंब उध्वस्त होण्याची भिती निर्माण झाली आहे.काही मंडळी नशा येण्यासाठी अंमली पदार्थाचा वापर करतात. तर व्यायामशाळेतील काही तरुण मंडळी नशा येणारे इंजेक्शनचा वापर करीत असून मटका व जुगारसारखे अवैध धंदे राजरोसपणे चालवित होते. पोलीस अधीक्षक म्हणून आंचल दलाल यांनी जिल्ह्याचा कारभार हाती घेतल्यावर अवैध धंदे वाल्यांविरोधात धडक कारवाई सूरू केली. जिल्ह्यातील प्रभारी अधिकारी यांची बैठक घेऊन अवैध धंदे चालविणाऱ्यांविरोधात कारवाई करा अशी सुचना केली. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर जिल्ह्यातील पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी कामाला लागले. काही कर्मचारी अवैध धंदे वाल्यांना भेटून धंदे चालवू नका, पोलीस अधीक्षक कडक शिस्तीच्या आहेत. पोलीस अधीक्षकांचा धसका काही दिवसात घेण्यास सुरुवात झाली. राजरोजपणे धंदे चालविणाऱ्यांविरोधात कारवाई सुरु केली. अवैध धंदे वाल्यांना आश्रय देणाऱ्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांविरोधात देखील कडक कारवाई केली. काहींना निलंबित केले. तर काहींच्या बदल्या केल्या.

जिल्ह्यात अंमली पदार्थाच्या आहाती जाऊन तरुणाई बिघडण्याचा धोका वाढण्याची भिती निर्माण झाली. त्यामुळे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांमार्फत कारवाईची मोहिम हाती घेण्यात आली. जुगार, मटका चालविणाऱ्यांसह गांजा चरस, केटामाईन सारखे अंमली पदार्थ विकणारे, बाळगणाऱ्यांविरोधात रायगड पोलिसांनी कारवाई केली. वर्षभरात १४० ठिकाणी वेगवेगळे छापे टाकण्यात आले. झालेल्या या कारवाईत ९३ कोटी ४५ लाख ७८ हजार ७७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण १२३.७६८ किलो वजनाचा अंमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला. त्यात २३.८९० किलो ग्रॅम वजन असलेला एक कोटी १९ लाख ४५ हजार रुपयांचे चरस, ४४.४३१ किलो ग्रॅम वजन असलेला ११ लाख ३२ हजार ७७५ रुपयांचा चरस, ४.७६ किलो ग्रॅम वजन असलेला चार कोटी २२ लाख ७६ हजार रुपयांचे एम.डी.अंमली पदार्थ तसेच ५०.६८७ किलो ग्रॅम वजन असलेला ८८ कोटी ९२ लाख २५ हजार रुपये किंमतीचा केटामाईनचा साठा जप्त करण्यात यश आले आहे.तसेच मटका जुगाराचा धंदा करणाऱ्यांवर छापे टाकून ५६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. अंमली पदार्थाच्या २६ तर मटका जुगारच्या ११५ कारवाया झाल्याची माहिती रायगड पोलिसांनी दिली. रायगड जिल्ह्यातील अवैध दारु विक्री, वाहतूक व निर्मितीवर अंकूश ठेवण्यासाठी रायगड पोलिसांनी २०२५ या वर्षात कंबर कसली आहे. अवैधरित्या दारु विक्री, वाहतूक व निर्मिती करणाऱ्यांविरोधात ६२५ कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये ८४ लाख ५५ हजार ५८५ रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. सण, उत्सव व निवडणुकीच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या जिल्ह्यातील गाव गुंडाविरोधात रायगड पोलिसांनी कारवाई केली आहे. मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ व ५७ अन्वये १४ जणांना तडीपार करण्यात आले असून ११ जणांना तडीपार करण्याची हालचाल सुरु आहे. दहा हजार ५१९ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांना दणका दिला आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलीसांकडून शर्तीचे प्रयत्न केले जात आहेत.

लोकसंसद

## तेलसंपन्न व्हेनेझुएलाची शोकांतिका



जगातील सर्वाधिक तेल साठा असलेल्या लॅटिन अमेरिकेतील व्हेनेझुएला या सार्वभौम देशावर लष्करी कारवाई करून अमेरिकेने व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना अटक केली. अमेरिकेने केलेल्या या एकतर्फी हल्ल्यामुळे अनेक देशांनी, या लष्करी कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन झाल्याचे टीकास्त्र अमेरिकेवर डागले आहे. खरे तर व्हेनेझुएला हा एकेकाळी जगातील चौथा सर्वांत श्रीमंत देश होता. त्याचे कारण म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला तेलाचा शोध लागल्यानंतर या देशाने तेलाच्या जोरावर आपली अर्थव्यवस्था वेगाने उभारली. नागरिक ऐषोआरामाचे जीवन जगू लागले. व्हेनेझुएलाची ही अर्थव्यवस्था पूर्णपणे तेलाच्या निर्यातीवर अवलंबून होती. मात्र २०१४ नंतर जागतिक पातळीवर तेलाचे भाव कोसळले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणाच मोडला. लोक अक्षरशः देशोधडीला लागले. व्हेनेझुएलाची सामान्य जनता व्हेनेझुएला सोडून पेरू, ब्राझील, कोलंबिया, व्हेनेझुएला, चिली अशा शेजारी देशांमध्ये स्थलांतरीत होऊ लागली. वास्तविक आजही अंदाजे ३०३ अब्ज बॅरल साठ्यासह व्हेनेझुएलामध्ये जगातील सर्वात मोठा तेलसाठा (१९ टक्के) आहे. परंतु आज या देशात तेलाचे उत्पादन कमालीचे घटले आहे. चलनाचे अवमूल्यन झाले आहे. इराण, इराक, कुवेत आणि सौदी अरेबिया या देशांच्या सहकार्याने पेट्रोलियम निर्यातदार देशांची संघटना (ओपेक) स्थापन करणारा व्हेनेझुएला एका अर्थाने आता अमेरिकेच्या कब्जात गेल्यामुळे त्याचे काय होणार आणि नुकतेच जेरबंद केलेले निकोलस मादुरो यांचा 'सद्दाम हुसेन' होणार का याकडे जगाचे डोळे लागले आहेत.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

विशेष

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले हे वृत्तपत्र पाक्षिक स्वरूपात होते. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले पाक्षिक सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे पाक्षिक सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पाक्षिक सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक पाक्षिक होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या पक्षिकाच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

# महामार्गाच्या कामात मनमानी

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील आंबेवाडी कोलाड वरसगांव येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला २०० मिटर अंतरावर अंडरपास बोगदे देण्यात यावे, सर्व्हिस रोडचे काम आजपर्यंत पुर्ण झाले नाही ते काम पूर्ण करून देणे, गटारावरील झाकणे बसवून देणे, तसेच सदर अंडरपास पेण, नागोठणा, लोणेरे, महाड येथे ठेवले आहेत मग आंबेवाडी कोलाड वरसगाव आमच्या वरच अन्याय का? अशा विविध मागण्यासाठी आंबेवाडी बाजारपेठेतील द. ग. तटकरे चौकात आंबेवाडी कोलाड वरसगाव पंचक्रोशीतील नागरिकांनी सोमवारी (दि.५) साखळी उपोषण सुरु केले.



- आंबेवाडी नाका येथे साखळी उपोषण सुरु
- सर्व्हिस रोडचे काम आजपर्यंत अपूर्ण

जो पर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाही तो पर्यंत हे उपोषण सुरुच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

याप्रसंगी आंबेवाडी ग्रामपंचायततीचे माजी सरपंच सुरेश महाबळे, चंद्रकांत लोखंडे, गणेश शिंदे, महेंद्र वाचकवडे, संजय कुर्ले, दयाराम पवार, चंद्रकांत जाधव, समीर महाबळे, बबलु सय्यद, भाऊ गांधी, शब्बीर सय्यद, विजय बोरकर, मंगेश सरफळे, उदय खामकर, विश्वास बागुल, विष्णु महाबळे, बिंदास धनावडे, नाना शिंदे, रविंद्र मामळुस्कर, तुकाराम सानप, बाळा हाडके, दगडू हाटकर, महादेव लोखंडे, तसेच असंख्य व्यापारी, कोलाड परिसरातील असंख्य मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

> आंबेवाडी वरसगांव नाका हे मध्यस्ती ठिकाण असून येथे विळा ते कोलाड, इंदापूर ते कोलाड, रोहा ते कोलाड, तसेच खांब ते कोलाड, चिंचवलीतर्फे अतोणे ते कोलाड या चारही बाजूनी असंख्य नागरिक ये-जा करीत असतात, परंतु कोलाड येथे अंडरपास रस्ता नसल्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांना एक किलोमीटर अंतरावर पुढे जाऊन वलसा घालावे लागत असल्यामुळे येथील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.
>
> - सुरेश महाबळे, माजी सरपंच, आंबेवाडी

> आंबेवाडी नाका येथे ७२ खेडेगावातील नागरिक ये-जा करीत असतात. परंतु येथे अंडरपास रस्ता नसल्याने येथील नागरिक, व्यापारी, रिक्षा, मिनिडोअर, टेम्पो चालक याच्या अडचणी वाढत आहेत.
>
> - विश्वास बागुल, कुणबी समाज युवानेता

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ जानेवारी

१) श्री. जयराम अंबाजी थळे
श्रीबाग, अलिबाग, ६-१-१९४०
२) श्रीम. सुरेखा सुरेश कुलकर्णी
अलिबाग, ६-१-१९४९
३) श्री. अनंत नथुराम पडते
नवगाव, ६-१-१९३५
४) श्री. मदनलाल बनवारीलाल कुमावत
अलिबाग, ६-१-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## दोन वर्षांत ३५५ एसटी अपघात

**रत्नागिरी :** रत्नागिरी विभागात २०२५ यावर्षी चालकांकडून एसटी बसेस चालवल्या. मात्र, काहींनी निष्काळजीपणामुळे तर ब्रेकफेल, टायर फुटल्यामुळे, काही रस्त्यांच्या कामामुळे, तांत्रिक कारणामुळे एसटी अपघात झाले. २०२४ व २०२५ या दोन वर्षांत किरकोळ, गंभीर, प्राणांतिक मिळून ३५५ एसटी अपघात झाले असून त्यामध्ये १९५ गंभीर अपघात आहेत, तर २०२५ यावर्षी रत्नागिरी विभागात १८२ एसटी अपघात झाले आहेत. त्यामध्ये ९९ अपघात गंभीर, ७६ किरकोळ तर उर्वरित सात अपघात प्राणांतिक आहेत. एसटीकडून दरवर्षी सुरक्षा अभियान घेऊनही एसटी अपघातात वाढ होत आहे. राज्यमार्ग परिवहन महामंडळातर्फे अपघातांची संख्या कमी करण्यासाठी चालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## पालीमध्ये दुर्मिळ सापाचे दर्शन

| विक्रमगड | प्रतिनिधी |

सध्या निसर्गात दुर्मिळ होत चाललेल्या पशु-पक्षी व सापांचे ग्रामीण भागात दर्शन होत आहे. पाली येथील नकुल पाटकर यांच्या दुकानात नागरी वस्तीमध्ये दुर्मिळ 'कुकरी साप' आढळून आला. हा साप बिनविषारी असून त्याची लांबी साधारणतः ३० ते ६० सेंटीमीटर इतकी असते. इतर सापांच्या तुलनेत याचे दात कमी असतात. वरच्या जबड्यातील मागील दात गुरख्यांच्या कुकरीसारखे वळणदार असल्याने या सापाला 'कुकरी साप' असे नाव देण्यात आले आहे. हा साप स्वभावाने चपळ, मात्र भित्रा व लाजाळू असतो. सरडे, पाली व त्यांची अंडी हे त्याचे प्रमुख खाद्य आहे. त्याचे शरीर तपकिरी रंगाचे असून त्यावर २० ते ६० काळे आडवे पट्टे आढळतात. धोका जाणवल्यास हा साप आपले शरीर फुगवतो. ग्रामीण भागात 'कुकरी साप' विषारी असल्याचा गैरसमज असल्याने अनेक वेळा या निरुपद्रवी सापाची हत्या केली जाते. या चुकीच्या समजुतीमुळे आकर्षक अशा दिसणाऱ्या कुकरी सपाची संख्या ग्रामीण भागातून दिवसेंदिवस झपाट्याने कमी होत असल्याची खंत सर्पमित्र पप्पु दिघे यांनी व्यक्त केली आहे.



## बंधारे ठरतात शेतकऱ्यांसाठी वरदान

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढून काही दिवस पाणी येथेच अडविले तर काही महिने या पाण्यामुळे विविध प्रश्नमार्गी लागतात. ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्नमार्गी लागतो. यामुळे गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे. यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणी पशू-पक्षांसाठी वरदान ठरत आहे.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात. मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्व समजते कारण विहीर, तलाव, कूपनलिका, ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करतात. पाणी हे आपले जीवन आहे. कारण जल है, तो हम है अशा पध्दतीचे उच्चार सातत्याने करीत असतो. यामुळे मात्र हे आचरणात कोणीही आणत नाही. तुरळक ठिकाणी बंधारे बांधून पाणी अडविले जाते. मात्र प्रत्येकांनी आपले नैतिक कर्तव्ये म्हणून पाणी अडविले पाहिजे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशू, पक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असतो. यामुळे बंधारे यांचे महत्व जाणून घेऊन पाणी अडविले पाहिजे. या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी होत आहे. शिवाय शेतकरी वर्ग यावरती भाजी पाल्यांचे उत्पन्न घेतले जाते. यामुळे रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत आहे.



## उरणमध्ये पथदिवे बंद | रस्त्यावर अपघाताचा धोका बळावला

| उरण | प्रतिनिधी |

उरण ही पर्यटननगरी म्हणून उदयास येत आहे. अशा पर्यटननगरीमधील मुख्य रस्ते हे गेल्या अनेक दिवसांपासून अंधारात गेले आहेत. त्यात जेएनपीए, सिडको आणि नॅशनल हायवेवर लाखो रुपये खर्च करून रस्त्यावर बसवलेले पथदिवे बंद पडल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सततच्या अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे अपघाताची संख्या बळावत आहे. तरी होणारे अपघात टाळण्यासाठी संबंधित प्रशासनाने पथदिव्यांची दुरूस्ती करावी अशी मागणी होत आहे.

अटल सेतू नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे उरण तालुक्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. चिरनेर गावातील श्री महागणपती देवस्थान, पिरवाडी चौपाटी, जेएनपीए बंदर, घारापुरी लेणी सह इतर महत्त्वाच्या गोष्टी असल्याने या तालुक्यात पर्यटक, भाविक नागरिक आणि स्थानिकांची मोठी वर्दळ असते. मात्र जेएनपीए, सिडको आणि नॅशनल हायवेनी तालुक्यातील रस्त्यावरील पथदिव्यांची काम संबंधित ठेकेदाराकडून वेळेत करुन न घेतल्यामुळे रस्त्यावरील दिवे लटकताना दिसत आहेत. काही ठिकाणची वायरिंग उघडी पडली आहे. तर काही ठिकाणी दिवेच दिसत नाहीत. त्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी, स्ट्रीट लाईट कागदावर सुरू असून रात्रीच्या वेळेस बंद अशी अवस्था झाली आहे. तरी अपघात टाळण्यासाठी संबंधित प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## वातावरण बदलामुळे नागरिक हैराण

| उरण | प्रतिनिधी |

गेली कित्येक दिवसांपासून सर्वत्र पडत असलेल्या दाट धुक्यामुळे परिसरात धुक्याची चादर पसरल्याने वाटाही धुक्यात हरवल्या आहेत. धुके इतके दाट आहे की, त्याचा जनजीवनावरही परिणाम झालेला दिसून येत आहे. काही प्रमाणात खोकला, सर्दीचे रुग्ण आढळून येत असून सरकारी अथवा खासगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी तसेच कोणी घरच्या घरी उपचार घेत आहेत.

गेली १५ दिवसांमध्ये अधूनमधून मोठया प्रमाणात थंडी जाणवत आहे. गेली चार, पाच दिवसापांसून एकाकी थंडीने जोर धरल्यामुळे जनजीवनावर त्याचा चांगलाच परिणाम होत असल्याचे पहावयास मिळत आहे. सकाळी सात वाजता सूर्य नारायणाचे होणारे दर्शन नऊ वाजले तरी होत नाही. वाढत जाणारी थंडी व पडत असलेले दाट धुके याचा जनजीवनावर चांगलाच परिणाम जाणवू लागला आहे. लहान बालके, वयोवृद्ध मंडळी, आजारी असणाऱ्यांना मात्र या वातावरणाचा चांगलाच परिणाम जाणवू लागला आहे.

## सावित्रीबाईंची जयंती साजरी

**कोर्लई :** मुरुड तालुका बौद्ध समाज सेवा संघ (रजि.) शाखा क्र.२ महिला मंडळा तर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी. जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आपले विचार मांडले. यावेळी विजया तांबे, लताताई दाभणे, अश्विनी सोरे, कांचन तांबे, ललिता तांबे, माधुरी शिंदे, सुशीला शिंदे, स्नेहल शिंदे, साधना जाधव, लता शिंदे, उज्वला खैरे, उर्मिला पाभरेकर, कविता कासारे, सविता पवार, वंदना मोरे उपस्थित होत्या.

## वक्तृत्व स्पर्धेत रातवड विद्यालयाचे यश

| माणगाव | प्रतिनिधी |

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा २०२५-२६ शनिवार (दि.३) जानेवारी रोजी विवेकानंद संकुल, सानपाडा येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संस्थास्तरीय स्पर्धेत रायगड विभागाची उज्ज्वल परंपरा कायम राखत माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले.

इयत्ता आठवी आर्या पालकर हिने प्रथम क्रमांक, इयत्ता नववी सृष्टी पवार हिने प्रथम क्रमांक, तर इयत्ता दहावी संस्कृती ऐत हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून विद्यालयाचे व रायगड विभागाचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले. या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, डॉ. शारदा निवाते, अजित शेडगे तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, डॉ. निलेश रेवगडे, सर्व पदाधिकारी, पालकवृंद, माजी विद्यार्थी व शिक्षणप्रेमींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## 'याला बोलतान राजकारन' नाटकाला प्रतिसाद

| चिरनेर | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील कोप्रोली येथील श्री समर्थ सद्गुरु रंगनाथ महाराज नाट्य मंडळाच्या सादरीकरणातून आणि कोप्रोली ग्रामस्थांच्या आयोजनातून येथील श्री समर्थ सद्गुरु रंगनाथ महाराज पुण्यतिथी उत्सवानिमित्ताने 'याला बोलतान राजकारन' या विनोदी दोन अंकी नाटकाचे शुक्रवारी (दि.२) सादरीकरण करण्यात आले. नाट्यप्रयोगाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला होता. नाटकाचे लेखन मनोहर फुंडेकर यांचे आहे. दिग्दर्शन लक्ष्मण भोईर यांनी केले आहे. सूत्रधार रुपेश पाटील, निर्मिती रामदास पाटील, मार्गदर्शक किशोर म्हात्रे, प्रतीक ठाकूर यांचे आहे. नाटकात विनोद पाटील, लक्ष्मण भोईर, दीपेश चोगले, प्रतीक ठाकूर, प्रफुल्ल पाटील, नितीन भोनले, भूषण म्हात्रे, रसिका म्हात्रे, नूतन म्हात्रे, दामिनी पाटील, आदित्य ठाकूर, देवदत्त माळी, प्रणिता म्हात्रे, सोहम म्हात्रे, सिद्धेश म्हात्रे, प्रवीण पाटील, प्रमोद ठाकूर, श्रेया शिंदे, दिया ठाकूर, आशिष म्हात्रे, निलेश शिंदे, प्रवीण पाटील, ओम म्हात्रे, सुशांत म्हात्रे, मयुरेश पाटील या कलाकारांनी भूमिका साकारल्या. आनंद ठाकूर, मोहन म्हात्रे, सुरज म्हात्रे, संगम म्हात्रे, मोरेश्वर म्हात्रे, अजिंक्य म्हात्रे, जितेंद्र पाटील, रवी म्हात्रे, चंद्राहास पाटील, ऋषिकेश कडू आदीने उत्तम सहकार्य केले.



## पारख असलेल्या ग्राहकांचा हिरमोड | शेतकऱ्यांचे गणित कोलमडले

# पोपटी खवय्यांना गावठी वालाची प्रतीक्षा

| कोलाड | प्रतिनिधी |

अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्याकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यानाही बसल्याचे चित्र रायगड जिल्ह्यातून समोर येत आहे. कारण आतापर्यंत वालाच्या शेंगाचे उत्पादनच झालेले नाही. त्यामुळे शेंगा प्रेमींना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे.



तत्पूर्वी वालाच्या शेंगांची आवक मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती. मात्र, मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधून-मधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पाहायला मिळत आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील भाजीपाला बाजारातील उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा ह्या अधिकतम बाहेरील जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगा प्रेमीच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीणमधील गावठी शेंगांच्या पोपटीच्या माध्यमातून चवीचा आस्वाद घेता घेत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांचा हिरमोड होत आहे. ग्राहक बाजारात येणाऱ्या शेंगा खरेदी करण्यास कानाडोळा करत असून गावठी शेंगांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे. भात कापणीनंतर लागवड केलेल्या वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते.

आता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने कडधान्ये, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असाल्याने शेतकऱ्याना नुकसान सहन करावा लागत आहे. अलीकडील बदलत्या हवामान स्थितीचा पिकांवर परिणाम होत असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात चालू हंगामात पावसाचा कालावधी अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात लांबल्यामुळे जमिनीत जास्त काळ ओलावा टिकून राहिला. त्यामुळे ग्रामीणमधील गावठी शेंगांसाठी काही काळ प्रतीभा करावी लागणार आहे.

### कडधान्यांच्या लागवडीस समस्या

*साधारणतः भातकापणीनंतर शेतकरी वाल, पावटा, मूग, मटकी, हरभरा, तसेच भुईमूग अशा कडधान्यांची लागवड करतात, मात्र जमीन पूर्णपणे ओली असल्याने या लागवडीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. पाऊस लांबल्याने जमिनी ओल्या राहिल्या. यामुळे बी पेरणीसाठी अनेक दिवस योग्य स्थिती तयार झालेली नव्हती. यावर्षी कडधान्याची उशिरा पेरणी झाली. त्यामुळे वाल ही उशीरा बाजारात येणार आहे.*

# निवडक



## साखर शाळेत सावित्रीबाईंची वेशभूषा

**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे (दि.३) जानेवारी रोजी थोर समाजसेविका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतीराव फुले यांची वेशभूषा केली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सुनिता गोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक राजेंद्र पाटील तसेच उपशिक्षिका स्मिता चिखले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या देखील जीवन परिचयावर आधारित वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. सदर कार्यक्रम प्रसंगी महिला पालक सुनिता गोतकर, मनिषा गुरव, कमला तांडेल यांचा सत्कार करण्यात आला.

## ज्येष्ठ नागरिक सभागृहाचे उद्घाटन

**खांब :** ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था खांब या संस्थेच्या वतीने खांब नाक्यावर नव्याने बांधण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक सभागृहाचे उद्घाटन विधान परिषदेत माजी आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. या सभागृहाचे उद्घाटन समारंभासाठी माजी सरपंच रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, मनोज शिर्के, नरेंद्र जाधव, ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेचे अध्यक्ष तुकाराम कापसे, उपाध्यक्ष अनंत पवार, सचिव अविनाश म्हात्रे, खजिनदार पांडुरंग खामकर, सहकार्यवाह नारायण धनवी, सदस्य रमाकांत जाधव, मंदाकिनी सावरकर, सुप्रिया वरखले, नामदेव मरवडे, धनाजी लोखंडे, सुरेश जाधव, बाळकृष्ण भोसले आदी उपस्थित होते.



## गोवा बनावटीची दारू जप्त

**चिपळूण :** शहरानजीक कळंबस्ते गावच्या हद्दीत कळंबस्ते-धामणंद रस्त्यावर रेल्वे फाटकाजवळ एका वाहनात मोठ्या प्रमाणात गोवा बनावटीचे मद्य असल्याची खबर मिळाल्याने उत्पादन शुल्क खात्याने कारवाई करत तब्बल दोन लाख ५८ हजार ९६० रुपये किमतीच्या मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमध्ये गोलन एस व्हिस्की (गोवा राज्यनिर्मित) या नावाचे ७५० मिलीचे २२ बॉक्स २६४ बाटल्या (रु.१,६८९६०), ९० हजारांची एक मारुती ८०० गाडी (एमएच-०४-एएक्स-७०५०) असा एकूण दोन लाख ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई दुय्यम निरीक्षक एस. मालुसरे, तसेच व्ही. एस. विचारे, मयूर पुरीबुवा यांनी केली. या आधी ऑगस्ट महिन्यातही अशा प्रकारे धाड टाकून राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी याच संशयितांकडून साडेपाच लाखांची गोवा बनावटीची दारू जप्त करून कारवाई केली होती. चार महिन्यांनी पुन्हा त्यांच्याकडूनच दारू जप्त करून कारवाई करण्यात आली.

## एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन

**पनवेल :** रंगरचना कला मंच नाट्य संस्था पनवेल मागील अनेक वर्षापासून विद्यार्थी तसेच नाट्यप्रेमीसाठी त्यांच्या अभिनय कौशल्याला वाव मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहे. त्या अनुषघांने संस्थेच्या वर्धापन दिनाचा औचित्य साधून एकपात्री अभिनय स्पर्धेचे संस्थेने आयोजन केले असून या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपला रंगमंची अविष्कार अभिनय कुणातून सादर करावा ही स्पर्धा ७ ते १६ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी व त्यापुढील खुल्या गटासाठी आयोजित केली आहे. असून ७ ते १६ या वयोगटाला पाच मिनिटे व खुल्या गटासाठी सात मिनिटांचा सादरीकरणाचा कालावधी ठेवण्यात आला आहे. स्पर्धा विनाशुल्क असून आपल्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन आम्ही संस्थेच्या माध्यमातून करीत आहोत दोन्ही गटातील विजेता प्रथम क्रमांक ३००० रुपये ट्रॉफी व प्रशस्तिपत्रक, द्वितीय क्रमांक २००० रुपये ट्रॉफी प्रशस्तिपत्रक तृतीय क्रमांक १००० रुपये ट्रॉफी व प्रशस्तिपत्रक देण्यात येईल. स्पर्धा दिनांक २२ जानेवारी रोजी सायंकाळी ३.०० वाजता कॉंग्रेस भवन हॉल, महानगर पालिका कार्यालया जवळ घेण्यात येणार आहेत. तरी या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा असे आवाहन आयोजकामनी केले आहे.



## मशिन्सची जागा बदलण्याची मागणी

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेसाठी पुन्हा एकदा अत्याधुनिक बॅग स्कॅनिंग मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. बाहेरगावी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या बॅगांची तपासणी या मशिन्सद्वारे करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून या मशिन्सची मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत होती. पूर्वीही अशा मशिन्स बसवण्यात आल्या होत्या, मात्र देखभालीअभावी त्या खराब झाल्याने काढून टाकण्यात आल्या होत्या. सध्या पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. दररोज हजारो प्रवासी या स्थानकावरून प्रवास करत असल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र ज्या ठिकाणी या मशिन्स बसवण्यात आल्या आहेत, ते ठिकाण गैरसोयीचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गर्दीचा विचार करता मशिन्सची जागा बदलण्यात यावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून केली जात आहे. तसेच, सुरक्षा वाढीसोबतच प्रवाशांची सोयही लक्षात घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# निवडक

## दिलीप पाटील सेवानिवृत्त



**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील भाकरवड गावाचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप जयराम पाटील त्यांच्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. दि. १ सप्टेंबर १९९१ रोजी ते पहिल्याच प्रयत्नात पोलीस भरतीत रायगड पोलीस दलात यशस्वी झाले. त्यांनी पोलिस ट्रेनिंग सेंटर अकोला येथे दोन वर्ष पूर्ण करून प्रथमच अलिबाग पोलीस मुख्यालय १९९३, त्यानंतर माणगाव, अलिबाग, खालापूर, रोहा, नागोठणे, अलिबाग मुख्यालय पोलीस उपनिरीक्षक पोलीस नियंत्रण कक्ष २०२२ श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अशा विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्यांनी आपली सेवा बजावली. उत्तम सेवेसाठी त्यांना कारकीर्दीत ७० रिवार्ड प्राप्त झाले आहेत. पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती घेऊन ते दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती सोहळा भाकरवड येथील निवासस्थानी ४ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला होता. यावेळी आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, तर पोलीस खात्यातील दत्ता श्रीवर्धनकर, हेमाडे सर, सुदेश मार्कंडे, दुशांत जाधव, प्रमोद सर, जितेंद्र भामरे, उदय सावंत, मंगेश भाऊ, सुधीर पाटील, संजय लांगी आदी उपस्थित होते.



## जीवनात आत्मविश्वास महत्त्वाचा : केवारी

**नेरळ :** कर्जत तालुक्यात आरोग्य क्षेत्रात कार्य करावे, असे आपल्या वडिलांना वाटत होते. त्यामुळे वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विद्या विकास मंदिर शाळेने आत्मविश्वास दिला आणि मनात जिद्द बाळगत हे स्वप्न साकार करता आले, असे प्रतिपादन डॉ. विशाल केवारी यांनी केले. नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रथमच माजी विद्यार्थ्याला निमंत्रित करण्यात आले होते. नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेच्या वार्षिक गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. विशाल केवारी हे उपस्थित होते. तर, संस्थेचे अध्यक्ष शशिकांत करंदीकर, उपाध्यक्ष बल्लाळ जोशी, कार्याध्यक्ष प्रसन्न खेडकर, माजी अध्यक्ष अरुण धारप यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १५९ रक्तपिशव्यांचे संकलन

**नरेंद्राचार्य संप्रदायाचा स्तुत्य उपक्रम**

**रसायनी :** जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या रामानंदचार्य संप्रदायाच्यावतीने खालापूर तालुक्याच्यावतीने मोहोपाडा येथे ग्रामपंचायत सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात महिलावर्गानेही सक्रिय भाग घेतला. १३ महिलांनी रक्तदान केले. एकूण १५९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिरासाठी मोहोपाडा ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे, उपसरपंच दीपक कांबळे, ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे, प्रतीक्षा राऊत, सदस्य आकाश जुईकर, केदार भोईर, माजी सरपंच रोशन राऊत, शशिकांत मुकादम, रमेश पाटील, व्यापारी असोसिएशन मोहोपाडा अध्यक्ष प्रदीप पाटील, उपाध्यक्ष मनोज सोमाणी, अमित शाह, सचिव सचिन मालकर व सर्व पदाधिकारी, ज्ञानेश्वर पाटील, माजी सरपंच राकेश खारकर, निलेश जुनगरे, पत्रकार राकेश खराडे, बाळासाहेब सावर्डे, मंगेश पाटील, योगेश खाने, अनिल पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ११ जानेवारीला पद्मदुर्ग जागर सोहळा

**आगरदांडा :** मुरूड पद्मदुर्ग जागर व गडभ्रमण सामाजिक संस्था, कोकण कडा मित्रमंडळ रायगड व सर्व संलग्न शिवप्रेमी संस्थांच्यावतीने पद्मदुर्ग सोहळा रविवार, दि. ११ जानेवारी रोजी पद्मदुर्ग किल्ल्यावर संपन्न होणार आहे. या कार्यक्रमावेळी मत्स्योद्योग, बंदरे विकास मंत्री नितेश राणे, खा. सुनील तटकरे, मंत्री भरत गोगावले, तहसीलदार आदेश डफल, बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलेकर, प्रकाश स्वामी जंगम, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, आशिलकुमार ठाकूर, राहुल कासार, शेखर मामा फरमन, संकेत वडके, सुरेश पवार, अनिकेत कदम, प्रकाश दाभेकर आदींसह शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ६ वाजता राधाकृष्ण मंदिर ते जेट्टीपर्यंत पालखी प्रस्थान, सकाळी ७ ते ८ वा. गड स्वच्छता, सकाळी ८ ते ९ वा. गड सजावट, सकाळी ९.३० वा. गडपूजन, सकाळी १० वा. गडदेवता कोटेश्वरी माता पूजन सकाळी १०.३० वा, छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमा अभिषेक व पूजन सकाळी ११ वाजता, व्याख्यान, मर्दानी खेळ, गडकोट शिवपालखी सोहळा, दुपारी १२.३० वा : कोटेश्वरी माता दर्शन व आरती दुपारी १ वा : महाप्रसाद, दुपारी २.०० वा गड स्वच्छता करण्यात येणार आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ, अलिबागमध्ये packing व Delivery साठी मूल मुली पाहिजेत. Contact No : 7875990092
- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# चौथ्या बंदरामुळे जेएनपीए अडचणीत

**• १५ हेक्टर खाजण क्षेत्रावर खारफुटी वाढली • मच्छिमार विरुद्ध पर्यावरणप्रेमींमध्ये संघर्ष**

| चिरनेर | प्रतिनिधी |



जेएनपीएच्या चौथ्या खासगी बंदराच्या विस्तारामुळे एकीकडे देशातील सर्वात मोठे बंदर कार्यान्वित झाले असले, तरी दुसरीकडे पारंपरिक मच्छिमारांचे खाजण क्षेत्र आणि पर्यावरण संवर्धन यांचा गंभीर संघर्ष उभा राहिला आहे. चौथ्या बंदराच्या विस्तारासाठी सुमारे २०० हेक्टर क्षेत्रावर दगड-मातीचा भराव टाकण्यात आला. यापैकी १५ हेक्टर क्षेत्रावर चिखलाचे मोठे डोंगर तयार होऊन तेथे मोठ्या प्रमाणावर खारफुटीची झाडे उगवली आहेत. त्यामुळे जेएनपीए अडचणीत आली आहे.

जेएनपीएने ११,२८४ कोटी रुपये खर्चून चौथ्या बंदराचा विस्तार केला आहे. हे चौथे बंदर देशातील सर्वात मोठ्या लांबीचे ठरले आहे. मात्र, या क्षेत्रात पारंपरिक पद्धतीने मासेमारी केली जात होती. मात्र, चिखलाचे डोंगर आणि खारफुटीच्या वाढीमुळे मच्छिमारांचे खाजण क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. त्यामुळे या १५ हेक्टर क्षेत्रावरील चिखलाचे डोंगर हटवून क्षेत्र सपाट करण्याची मागणी जेएनपीए कामगार ट्रस्टी रवींद्र पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, या क्षेत्रात उगवलेली खारफुटी ही दुर्मिळ व पर्यावरणदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असल्याने ती तोडल्यास पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होईल, अशी भीती व्यक्त करत पर्यावरणप्रेमी संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. खारफुटी नष्ट झाल्यास जैवविविधतेवर, किनारपट्टी संरक्षणावर आणि हवामानसंतुलनावर विपरीत परिणाम होणार असल्याचे पर्यावरणवाद्यांचे म्हणणे आहे. मच्छिमारांची उपजीविका वाचवायची की दुर्मिळ खारफुटीचे संवर्धन करायचे, या दोन परस्परविरोधी मागण्यांमुळे जेएनपीए प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. याप्रकरणी अंतिम निर्णय घेण्यासाठी जेएनपीए अध्यक्ष गौतम दयाल यांच्याशी चर्चा करून तोडगा काढण्यात येईल, अशी माहिती सीजीएम जे. वैद्यनाथन यांनी दिली आहे.

## सफाई कर्मचाऱ्यांसाठी एक हात मदतीचा

| माथेरान | प्रतिनिधी |



तिकीट चेकिंग वेल्फेअर ट्रस्ट मुंबईने ३९ व्या वर्षात पदार्पण केल्याचे औचित्य साधून नववर्षाचे स्वागत 'एक हात मदतीचा' या उपक्रमांद्वारे करण्यात आले. तिकीट चेकिंग वेल्फेअर ट्रस्ट, मुंबई रोटी डे ग्रुप कल्याण व स्वामी नारायण हॉल कल्याण यांच्या सहकार्याने व ट्रस्टच्या ॲक्टिव सभासद यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबविण्यात आला. दरम्यान, कल्याण साफसफाई कर्मचाऱ्यांना अत्यावश्यक अन्नधान्याच्या पाकिटांचे मोफत वाटप शनिवार, दि. ३ रोजी सकाळी ११ वाजता कल्याण स्टेशन मॅनेजर ऑफिसमध्ये शशांक दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून नितीन भाई (रोटी डे ग्रुप, कल्याण), दिनेश ठक्कर (स्वामी नारायण हॉल, कल्याण), मधुबेन ठक्कर, श्री. पुजारा व ज्योति बेन पुजारा (समाजसेविका), रेल्वेचे अधिकारी हरजीराम मीणा (स्टेशन मॅनेजर कल्याण), राहुल गुजरे (कल्याण), राहुल मालवीया (कल्याण) व ट्रस्टचे अध्यक्ष डी. व्ही. चिंदरकर आदी मान्यवरांच्या हस्ते ६५ सफाई कर्मचाऱ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.

ट्रस्टतर्फे सेक्रेटरी हरिश मोंडकर, खजिनदार गिरीश कदम, उपाध्यक्ष अभय कांबळे, ट्रस्टी आर.एम. बिरवटकर, प्रसाद करलकर, सुनील नैनानी, पी.डी. मोरे, युवराज डोहाळे उपस्थित होते.

## तुपगाव येथून अंजली शिंगे बेपत्ता

**रसायनी :** अंजली निलप्पा शिंगे वय २३ वर्षे, व्यवसाय-नोकरी, सध्या रा. तुपगाव, ता. खालापूर, जि. रायगड, मूळ रा. हुवीनहल्ली, ता. सिंदगी, जि. विजापूर, राज्य कर्नाटक, ही दि. १० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वा. कामावर जाते असे सांगून घरातून कोठेतरी निघून गेली आहे. घरातील मंडळींनी तिचा शोध घेतला असून, ती त्याचे राहते घरी परतली नसल्यामुळे मुलीचे वडील निलप्पा लिंगप्पा शिंगे यांनी खालापूर पोलीस ठाण्यात अंजली बेपत्ता असल्याबाबत खबर दिलेली असून, पोलीस ठाण्यात याबाबत नोंद करण्यात आली आहे.




## विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्याचे प्रशिक्षण

**वनविभागाकडून उत्तम मार्गदर्शन**

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील गौळवाडी येथील विद्यालयामध्ये वन विभाग यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्याचे प्रशिक्षण सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दिले.

सामाजिक वनीकरण विभाग वनपरिक्षेत्र कर्जत यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील गौळवाडी येथील विद्यालयात हरित सेना या उपक्रम राबविण्यात आला आहे. सामाजिक वनीकरणकडून विविध शाळांमधे निसर्ग आणि पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गौळवाडी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गलगले हे उपस्थित होते. उपक्रमांसाठी सामाजिक वनीकरण विभाग कर्जतकडून वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत, वनपाल लांगी, प्रशांत महानूनी आणि वनरक्षक निकम, शीतल साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्यासाठी मार्गदर्शन केले आणि शाळेच्या एका भागात रोपवाटिका बनवून दिली. कर्जत येथील अभिनव शाळेच्या विद्यार्थ्यांनीदेखील रोपवाटिका बनविण्याचा कामात सहभाग घेतला आणि रोपांच्या लागवडीत हातभार लावला.

हरित सेना यांच्या माध्यमातून निबंध स्पर्धा, एक पेड माँ के नाम, प्लास्टिकमुक्त परिसर आदी उपक्रम राबविले जात आहेत. त्याचवेळी घनकचरा व्यवस्थापन, आईच्या नावाने एक झाड, एक निरोगी वनस्पती लावण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला. विद्यार्थ्यांना वन अधिकारी राऊत तसेच मुख्याध्यापक गलगले आणि संजय देसले यांनी उत्तम मार्गदर्शन केले.

## किरवलीत शौर्य दिन साजरा

**भीमा-कोरेगाव विजयस्तंभाच्या प्रतिकृतीला अभिवादन**

| नेरळ | प्रतिनिधी |



भीमा-कोरेगाव विजयस्तंभाची प्रतिकृती कर्जत तालुक्यातील किरवली येथे बनवली आहे. या विजय स्तंभाला अभिवादन करण्यात आले. किरवली येथे २०८ वा भीमा कोरेगाव शौर्य दिन साजरा करण्यासाठी भाविक उपस्थित होते.

कर्जत तालुक्यातील किरवली येथे भीमा कोरेगाव विजयस्तंभाचा २०८ वा शौर्य दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. येथील बोधिसत्व बुद्ध विहाराच्या वतीने विजयस्तंभाची देखणी प्रतिकृती साकारून ऐतिहासिक लढाईतील वीरांना मानवंदना देण्यात आली. एक जानेवारी १८१८ रोजी भीमा कोरेगाव येथे झालेल्या ऐतिहासिक लढाईत महार रेजिमेंटच्या केवळ ५०० सैनिकांनी पेशव्यांच्या २८,००० सैन्यांचा पराभव केला होता. या अतुलनीय शौर्याचे प्रतीक म्हणून ब्रिटिशांनी १८५१ मध्ये या विजयस्तंभाची उभारणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या स्तंभाला भेट देऊन मानवंदना दिल्यानंतर, हा दिवस दरवर्षी जगभरातील भीमानुयायांसाठी प्रेरणा आणि सामाजिक समतेचे प्रतीक बनला आहे. दरवर्षी लाखो अनुयायी विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी जातात. या सोहळ्याप्रसंगी बोधिसत्व बुद्धविहार कमिटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतिमंद मुलांच्या उन्नतीसाठी सहकार्य करणार : शेंडे

| खोपोली | प्रतिनिधी |

शालोम एज्युकेशन सेंटरच्या माध्यमातून १८ वर्षांवरील अंपग, मतिमंद मुलांनी स्वतःची हस्तकला विकसित करून उत्पन्नाचे साधन मिळावे यासाठी सुभाष महादेव दोंदे मेमोरियल ट्रेनिंग सेंटर सुरू केले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांच्या हस्ते या सेंटरचे नुकतेच उद्घाटन झाले. राजकारणी स्वार्थ ठेवून समाजात काम करतात, मात्र डॉ. दोंदे आणि उल्हासराव देशमुख कोणाताही स्वार्थ न ठेवता मतिमंद मुलांसाठी काम करतात, ही खरे देवाची सेवा आहे, असे उद्गार नगराध्यक्ष शेंडे यांनी काढत मतिमंद मुलांच्या उन्नतीसाठी सहकार्य करण्याचा शब्द दिला. डॉ. कुंदा दोंदे आणि सुभाष महादेव दोंदे चॅरिटेबल संस्था संचालित शालोम एज्युकेशन सेंटरसाठी शंकर मंदिरासमोरील जागेत इमारत बांधली आहे. याठिकाणी ३५ ते ४० मतिमंद मुले-मुली शिक्षण घेत आहेत. स्वतःची हस्ता विकसित करून कागदी फुले, फुलगुच्छ, अगरबत्ती अशी उत्पादने तयार करून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. १८ वर्षांवरील मुलीमुलांना स्वयंरोजगार मिळावा यासाठी सुभाष महादेव दोंदे मेमोरियल ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यात आले आहे.

## समाज घडवण्यासाठी वारकरी संप्रदायाची गरज

**सुरेश देशमुख यांचे प्रतिपादन**

| खोपोली | प्रतिनिधी |



एक चांगला, सुसंस्कृत समाज तसेच तरुण वर्ग घडवायचा असल्यास प्रत्येकाने वारकरी संप्रदायाची जोड धरून साधूसंतांनी दिलेल्या शिकवणीचे ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज असून, समाजामधील पसरलेला अंधार दूर होणे महत्त्वाचे असल्याने प्रत्येकाने वारकरी संप्रदाय वाढवण्यासाठी व टिकविण्यासाठी मेहनत घेणे अधिक योग्य आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते सुरेश देशमुख यांनी व्यक्त केले.

खालापूर तालुक्याची भूमी संत महात्माच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असल्याने सर्वत्र ठिकाणी आताची नवतरुण पिढी घडवण्यासाठी अनेक विविध समाजोपयोगी कार्यक्रम वारकरी संप्रदाय राबवत आहे. गेल्या २००७ सालापासून हरिओम संत सेवा मंडळ डोळवली पंचक्रोशी विभाग आयोजित हरिनाम संत सेवा मंडळ त्रिदिनी अखंड हरिनाम जप यज्ञ सोहळा ह.भ.प. कृष्णा महाराज लांबे, ह.भ.प. तानाजी महाराज कर्णूक, ह.भ.प. रामदास महाराज पाटील यांच्या प्रेरणेने ह.भ.प. गोपीनाथ महाराज पाटील, ह.भ.प. मधुकर महाराज कालेकर, ह.भ.प. दिगंबर महाराज सणस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ह.भ.प. मोहन महाराज सणस यांच्या संकल्पनेतून राबवित असल्याने डोळवली परिसरात या सप्ताहाच्या माध्यमातून नवचैतन्य पसरत असून, यावर्षीचा सप्ताह दि. १ ते ४ जानेवारी या कालावधीत संपन्न झाला.

या हरिनाम सप्ताहामध्ये पांडुरंगाची महापूजा, कलश, विणा, पताका, टाळमृदुंग, ग्रंथ, व्यासपीठ, तुळस, दीप पूजन, शिवप्रतिमा पुजन तसेच दैनंदिन काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, भागवत कथा, हरिनाम, संगीत भजन, हरिकीर्तन तसेच दीपोत्सव, काल्याचे कीर्तन, दिंडी सोहळा असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडल्याने या माध्यमातून पंचक्रोशीत जनजागृती झाली आहे.

**पोलीस रेंझिंग डे सप्ताहानिमित्त मार्गदर्शन** | **विद्यार्थ्यांनी जाणून घेतले पोलिसी कामकाज**

## कुतूहलातून आत्मविश्वासाकडे वाटचाल

| पनवेल | प्रतिनिधी |





(छायाचित्र : राजेश डांगळे)

पोलीस रेंझिंग डे सप्ताह २०२६ निमित्त नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने विविध जनजागृती उपक्रम राबवले जात असून, त्याचाच एक भाग म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्यात विद्यार्थ्यांची प्रेरणादायी भेट पार पडली.

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी संचलित Barns High School & Jr. College, पनवेल येथील विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्याला भेट देत देशाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या पोलिसांच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. पोलीस ठाण्यात प्रवेश करताच विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत कुतूहल, तर मनात आत्मविश्वास दिसून आला. शिस्तबद्ध कार्यपद्धती, आधुनिक साधनसामग्री आणि गुन्हे नियंत्रणासाठी वापरली जाणारी यंत्रणा पाहताना प्रत्येक क्षण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

विशेषतः शस्त्रांची माहिती घेताना विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर दिसणारा आत्मविश्वास भविष्यातील सक्षम आणि निर्भय पिढीची जाणीव करून देणारा होता. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना कायदा, सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारी याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

ही भेट विद्यार्थ्यांसाठी केवळ शैक्षणिक न राहता आयुष्यभरासाठी प्रेरणा देणारी शिदोरी ठरली, तर पोलिसांबद्दलचा आदर आणि विश्वास अधिक दृढ झाला, असेही यावेळी विद्यार्थ्यांनी सांगितले.

## रस्त्यालगतचा वणवा अपघाताला निमंत्रण

**पाताळगंगा :** वणवा लावण्याच्या मानवी वृत्तीमध्ये वाढ झाली असून, डोंगराच्या समवेत रस्त्यालगत वणवा पेटविल्याने रस्त्यावर आपघाताला निमंत्रण मिळत आहे. दरवर्षी पावसाळा संपताच माळरानावर मोठ्या प्रमाणात गवत निर्माण होत असते. हेच गवत गुरांचे अन्न निर्माण होत असल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागत आहे. मात्र, माळरानावर वनवे लागत असल्यामुळे चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. या वणव्यामुळे पक्ष्यांचे घरटे, गुरांचा चारा, औषधी वनस्पती, प्राणी तसेच आता जंगलातील तयार झालेला रानमेवा या वणव्यात जळून खाक होत असल्याचे दुर्दैवी चित्र अनेक ठिकाणी पाहावयास मिळत आहे. सध्या जंगलात रानमेवा तयार होत आहे. परंतु, रणरणत्या उन्हामध्ये हा वणवा लागल्यानंतर येथील परिसर असह्य होऊन जात आहे.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरघर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बोरघर | ३३१ | ०-४७-१० <br> पो.ख.०-०५-३० <br> ०-५२-४० | १२.२५ | १) कमळाकर विठोबा हजारे, <br> २) प्रविण मनोहर हजारे, |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची असून ती विकणेचा त्यांना हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर अन्य कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता.०६/०१/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्र.:-केजेटी/एचएसजी/(टीसी)/४३६४/२०१९-२०२०/२०२०
पत्ता:- सर्व्हे नं.२/२ अ/प्लॉट क्र. १ ते ४ मौजे मुद्रे (बु.)
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१,

दिनांक : ०५/०१/२०२६

मार्वेल क्षिप्रा रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सर्वे नंबर २/२ अ/प्लॉट क्र. १ ते ४ मौजे मुद्रे (बु.) ता. कर्जत, जि. रायगड पिन -४१०२०१.

यांच्याकडून सोलर प्लांट बसवून सेवा देणाऱ्या अनुभवी संस्थांना आमंत्रित करीत आहे. तरी दिनांक १०/०१/२०२६ संध्याकाळी ६ पर्यंत सीलबंद पाकिटात आपल्या निविदा वरील पत्त्यावर पाठवून देण्यात याव्या.

संस्थेची माहिती:
सदनिका संख्या: १७२
गाळ्याची संख्या: ३८
एकूण विंग : १० (तळ मजला चार मजला)
एकूण वीज वापर : महिना ६००० युनिट

व्यवस्थापन समितीला कोणत्याही कारणास्तव निविदा स्वीकारण्याचा आणि नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

संपर्क क्रमांक: १) ७३०४०१९९३३- श्री स्वप्निल मालकर
२) ७३८७७२४९०४ श्री रामदास लोभी

**मार्वल क्षिप्रा रेसिडन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या**
**सही/-**
**अध्यक्ष खजिनदार सचिव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) नियती शैलेश ओक व २) शैलेश प्रभाकर ओक यांचे कडून त्यांचा असणारा हिस्सा कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | ३५/२/२ | ००.११.४० <br> पो.ख. ००.०३.६० <br> एकुण ००.१५.०० | ०२.७० |

विद्यमान मालक १) नियती शैलेश ओक व २) शैलेश प्रभाकर ओक यांचा असणारा नोंदणीकृत खरेदीखत क्र. २८८४/२०२४ अन्वये प्राप्त क्षेत्र ००.०९.०० हे.आर. हा अविभक्त हिस्सा या नोटिसीचा विषय आहे..

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क, सरकारी, निम सरकारी संस्था यांचा बोजा थकबाकी या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५/०१/२०२६

सही/-
**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा.क्र.९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. जनक कुमार विल्लयतीराम खन्ना, श्री. मनोज जनक खन्ना, सौ. सुमन जनक खन्ना व श्री. गौतम जनक खन्ना यांचे अखत्यारी श्री. गणेश लक्ष्मण कानडे, रा. करचुंडे, पो. जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड, पिन नं. ४१०२०५ यांनी दिलेल्या माहितीवरून सादर केलेले कागदपत्रांवरून व सांगणेवरून आमचे अशिलां तर्फे खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात जाहीररित्या कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वासूंडे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | खाते नं. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १४९ | ३७२ | श्री.स्थापत्य प्रा.लि. | २-३२-१० | ०.४५ |
| | ४५० | अशोक माधव पटवर्धन वै.२ | ०-२१-४५ | ०.०४ |
| | ४५३ | अशोक माधव पटवर्धन वै.२ | ०-२१-४५ | ०.०४ |
| | ४५७ | किर्ती शुक्ला वै. १ | ०-२४-०० | ०.०७ |
| | ४५८ | तुषार लक्ष्मण टकले वै.१ | ०-२०-०० | ०.०६ |
| | ४५९ | पुजा अर्पित बंसल | ०-२०-०० | ०.०७ |
| | ४६० | हरेराम पांडुरंग दहिफळे | ०-२२-०० | ०.०७ |
| | ४६२ | अभिजीत सुरेश हांडे | ०-२४-०० | ०.०७ |
| | ४६४ | विजेंद्र कुमार सिंह वै.१ | ०-४०-०० | ०.१२ |
| | ४६५ | सुचित्रा धर्मवीर डांगी | ०-२०-०० | ०.०६ |
| | ४६६ | वसंत नारायण सावंत | ०-३०-०० | ०.०८ |
| | ४६९ | अतुल गौतम ओव्हाळ वै.१ | ०-४५-०० | ०.०९ |
| | ४७२ | सुधाकर किसनराव नेटके | ०-२०-०० | ०.०६ |
| | ४७५ | अनिल कुमार सिन्हा वै.१ | ०-५०-०० | ०.०९ |
| | ४८१ | रविश पाण्डेय | ०-२०-०० | ०.०३ |
| | ४८४ | अंकित मोदी वै. १ | ०-३७-०० | ०.०६ |
| | ४८६ | पारस नाथ | ०-३८-०० | ०.०९ |
| | ४८७ | जितेंद्र रमाशंकर सिंह | ०-३०-०० | ०.०६ |
| | ५०० | वैभव भगवानजी परमार | ०-२५-०० | ०.०६ |
| | ५०९ | विशाखा सोमनाथ पवार | ०-२०-०० | ०.०३ |
| | ५२२ | प्रसाद रमाकांत जयभाय | ०-२८-०० | ०.०७ |
| | | **एकुण क्षेत्र** | **७-८८-००** | **१.८१** |

उपरोक्त वर्णनाची गट नं. १४९ ची मिळकत आमचे अशिल यांनी दि. २९ मे १९९५ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत दस्त नं. ६१५/१९९५ अन्वये मिळकत मालक श्री. किशोर गणपत दळवी याचे कडुन खरेदी केली असुन नजरचुकीने/अनावधानाने सदर खरेदीखताचा अंमल मिळकतीचे अभिलेख दप्तरी करणेचे राहुन गेले. उपरोक्त वर्णनाची गट नं. १४९ ची मिळकतीचा ७/१२ उतारा मिळकत श्री. किशोर गणपत दळवी याचे नावे असल्याचा गैरफायदा घेत त्याने सदर मिळकत अनाधिकारे श्री. स्थापत्य प्रा. लि. यांस तथाकथित बेकायदेशीर खरेदीखतान्वये सन २००७ मध्ये खरेदी दिली. तर श्री. स्थापत्य प्रा. लि. यांनी उपरोक्त वर्णनाच्या व्यक्तींस वर वर्णन केलेप्रमाणे तथाकथित बेकायदेशीर खरेदीखतान्वये खरेदी दिले.

वास्तविक पाहता उपरोक्त वर्णनाच्या व्यक्तींनी वर वर्णनाच्या मिळकतीचा टायटल सर्च न घेताच खरेदी केल्या असलेने वर नमुद व्यक्ती बोनाफाईड पर्चेसर नसुन त्यांच्या लाभांत झालेली तथाकथित खरेदीखते बेकायदेशीर, बोगस, बनावट असुन त्या आधारे त्यांस कोणताही मालकी हक्क प्राप्त झालेला नसुन सदरची खरेदीखते आमचे अशिलांवर बंधनकारक नाहीत. आमचे अशिलांनी त्यांचे विरूद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे.

सबब वर वर्णन केलेल्या व्यक्तींकडुन उपरोक्त वर्णनाच्या मिळकती मधील कोणतेही क्षेत्र खरेदी अथवा विक्री करू नये. तसे केल्यास सदरचे खरेदी-विक्री व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०६/०१/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
मु.पो. पाली. बल्लाळेश्वर नगर,
ता. सुधागड, जि. रायगड, ४१०२०५
मो.नं. ९२०९२९६७२५


# वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल कु. अपर्णा बनीलाल आवचार यांनी मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. अमीर अ गफूर सय्यद २) श्री. अश्पाक अस्लम पटेल यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| ६४ | ५ | ०-१७-०० | ०-०५ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: ०६/०१/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. मनोज जनक खन्ना याचे अखत्यारी श्री. गणेश लक्ष्मण कानडे, रा. करचुंडे, पो. जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड, पिन नं. ४१०२०५ यांनी दिलेल्या माहितीवरून, सादर केलेले कागदपत्रांवरून व सांगणेवरून आमचे अशिला तर्फे खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात जाहीररित्या कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**
**मौने - वासूंडे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | खाते नं. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १२७/अ | ५१२ | विशाखा सोमनाथ पवार | ०-९१-२० <br> पैकी ०-७९-२० | ०.७४ |

उपरोक्त वर्णनाची गट नं. १२७/अ ची मिळकत आमचे अशिल यांनी दि. २२ मे १९९२ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत दस्त नं. १०१८/१९९२ अन्वये मिळकत मालक बाबू भिकू साळूंके याचे कडुन खरेदी केली असुन नजरचुकीने/अनावधानाने सदर खरेदीखताचा अंमल मिळकतीचे अभिलेख दप्तरी करणेचे राहुन गेले. उपरोक्त वर्णनाची गट नं. १२७/अ ची मिळकतीचा ७/१२ उतारा मिळकत बाबू भिकू साळुंके याचे नावे असल्याचा गैरफायदा घेत बाबू भिकू साळूंके यांचे मृत्यू पश्चात सावित्रीबाई बाबू साळुंके, भिकू बाबू साळूंके, अंकुश बाबू साळुंके व सुलोचना सखाराम वाघमारे यांनी स्वतःची वारस नोंद करून सदरहू मिळकत अनाधिकारे श्री. प्रशांत सुपडू पगारे यांस तथाकथित बेकायदेशीर खरेदीखतान्वये सन २००८ मध्ये खरेदी दिली. तर श्री. प्रशांत सुपडू पगारे यांनी विशाखा सोमनाथ पवार हिस तथाकथित बेकायदेशीर खरेदीखतान्वये खरेदी दिली.

वास्तविक पाहता विशाखा सोमनाथ पवार व श्री. प्रशांत सुपडू पगारे यांनी वर वर्णनाच्या मिळकतीचा टायटल सर्च न घेताच खरेदी केली असलेने विशाखा सोमनाथ पवार व श्री. प्रशांत सुपडू पगारे हे बोनाफाईड पर्चेसर नसुन त्यांच्या लाभांत झालेले तथाकथित खरेदीखत बेकायदेशीर, बोगस, बनावट असुन त्या आधारे त्यांस कोणताही मालकी हक्क प्राप्त झालेला नसुन सदरची खरेदीखते आमचे अशिलांवर बंधनकारक नाहीत. आमचे अशिलांनी त्यांचे विरूद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे.

सबब वर वर्णन केलेल्या व्यक्तीकडुन उपरोक्त वर्णनाच्या मिळकती मधील कोणतेही क्षेत्र खरेदी अथवा विक्री करू नये. तसे केल्यास सदरचे खरेदी-विक्री व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०६/०१/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
मु.पो. पाली. बल्लाळेश्वर नगर,
ता. सुधागड, जि. रायगड, ४१०२०५
मो.नं. ९२०९२९६७२५

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग**
**तहसिल कार्यालय, अलिबागच्यामागे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१**
दुरध्वनी क्र. ०२१४१-२२४४३४, ई मेल : sdoalibag@gmail.com

क्र. उविअ/कात-२/भूसंपादन/मौजे महान/नोटीस/एस.आर. क्र.०९/२०२३/२०२५ दि. २/१/२०२६

**नोटीस**
**(नियम ६ नुसार)**

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली आणि गाव महान, ता. अलिबाग, जि. रायगड येथे असलेली जमीन, भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये न्याय्य नुकसानभरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याचे कलम ११ (१) अन्वये उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग, जि. रायगड यांचेमार्फत महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, नोव्हेंबर २७-डिसेंबर ३, २०२५ रोजी पृष्ठ ११ ते १३ येथे प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेप्रमाणे आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. तद्नुसार त्या जमिनीमध्ये हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना जर त्यांचा उक्त भुमी संपादनास आक्षेप असेल तर वरील प्राथमिक अधिसुचनेप्रमाणे आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. तद्नुसार त्या जमिनीमध्ये हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना जर त्यांचा उक्त भूमी संपादनास आक्षेप असेल तर, वरील प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यापासुन ६० (साठ) दिवसांच्या आत, त्यांच्या आक्षेपांचे लेखी निवेदन उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग यांच्यासमोर सादर करण्यास फर्मावण्यात येत आहे.

जे आक्षेप निवेदन नियम तारखेनंतर पोहोचले असेल किंवा ज्यामध्ये पाठवणाऱ्याच्या जमिनीतील हितसंबंधाचे स्वरुप स्पष्टपणे विशद केलेले नसेल असे कोणतेही आक्षेप निवेदन तडकाफडकी नाकारले जाण्यास पात्र असेल.

नियत दिनांकास पोहोचलेल्या आक्षेपांची दिनांक १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग यांचे कार्यालय येथे चौकशी करण्यात येईल आणि आक्षेप घेणाऱ्यास व्यक्तिशः किंवा अधिवक्त्यामार्फत तेथे उपस्थित राहता येईल आणि आपल्या आक्षेपाच्या पुष्ट्यर्थ कोणताही तोंडी किंवा लेखी पुरावा सादर करता येईल.

**मौजे :- महान** **तालुका:- अलिबाग** **जिल्हा :- रायगड**

| अ. क्र. | स.नं./ग.नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | संपादना खालील क्षेत्र हे. आर | हितसंबंधित व्यक्तीचे नाव व पत्ता | इतर अधिकारात | झाडे, बांधकामे, इत्यादी असल्यास त्यांचे तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | १४ पै | ०१.५९.१० | ०.११.३५ | मंदा पंढरीनाथ बळी | - | - |
| २ | १५ पै | ०.८६.०० | ०.०१.४० | प्रविण दत्तात्रेय शिंदे, मनोज दत्तात्रेय दासगांवकर | | १२ झाडे |
| ३ | ३७ पै | ०.००.०६ | ०.००.०६ | हरी येसु खंडागळे | | १ बांधकाम |
| ४ | ४२ पै | ०.३६.०० | ०.३६.०० | चंद्रभागा महादेव पवार, शंकर महादेव पवार, अमर महादेव पवार, अनिल महादेव पवार, संतोष महादेव पवार, जयश्री दत्तात्रेय शिंदे, सुनिता चंद्रकांत घाग, विजया विलास पवार, संचिता विलास पवार, सपना महेश शेडगे, साधना सुधीर तांबे, निता शाम मुसळे, इंदुबाई तुकाराम सकपाळ, सोनाल सुरेश पवार, वैभवी वैभव शिंदे, मनोज सुरेश पवार, ऋतुजा राजेश शेडगे, आशा दिलीप पवार, समिर दिलीप पवार, सुविधा संदिप तांबे | | |
| ५ | १५६पै | ०.००.०५ | ०.००.०५ | श्रीपती दळवी | | १ बांधकाम |
| ६ | १७९पै | ०.०२.०० | ०.०२.०० | नाना धोंडू मोरे | संरक्षित कुळ-मारूती मव्या पाटील | १ बांधकाम |
| ७ | १८५ पै | ०.१६.२० | ०.१६.२० | चंद्रकांत भालचंद्र भाटकर | | |
| ८ | १९८ पै | ०.८९.०० | ०.१३.५० | विजय भास्कर महाले, प्रदिप सुरेश महाले, मिलिंद सुरेश महाले, निर्धरा निरंजन विचारे,सुवर्णा सुरेश महाले, मंजुळा भास्कर महाले, मंगळा भास्कर महाले, संजुळा भास्कर महाले, लक्ष्मी भास्कर महाले, दिपक हरिश्चंद्र महाले, विशेष हरिश्चंद्र महाले, सरिता हरिश्चंद्र महाले, तारामती हरिश्चंद्र महाले | महान सो.चा. रु.२५० / व रु.५००/- चा बोजा | |
| ९ | १९९ पै | ०१.०९.०० | ०.३२.९० | नंदकुमार बाळाराम मयेकर | बोजा सरकारी सोसायटी इकरार दि रायगड डिस्ट्रीक्ट को ऑप बँक लि. शाखा नागाव यांचा रक्कम रु ५०००००/- | |
| १० | २०० पै | ०१.०२.५० | ०.२४.५० | संतोष लक्ष्मण साळावकर, सुनिल हरिश्चंद्र म्हात्रे | | |
| ११ | २०१ पै | १.२८.७० | ०.१३.१० | दत्तात्रेय बाबाजी लाते, गणपत धर्मा मोरे | बोजा राष्ट्रीयकृत बँक गहाण ख की पै सिताबाई रामचंद्र जोशी र.रु.२२८३/-, महानसो. र.रु.२००० चा बोजा | १४ झाडे |
| १२ | २०२ पै | १.६४.६० | ०.१७.७० | केशव काशिनाथ पडवळ, दत्तात्रेय काशिनाथ पडवळ, शंकर काशिनाथ पडवळ, एलिस दाविद वासकर, नोवेल दाविद वासकर, रुथा एलकान तळकर, बेंजामिन दाविद वासकर, हव्वा शियोन सातमकर, सालोमन दाविद वासकर | | १८ झाडे |
| १३ | २०३पै | २.४२.७० | ०.४१.५५ | सुभाष गणपत शिर्के, विजय गणपत, शिर्के, प्रमोद गणपत शिर्के, रामदास गणपत शिर्के, रत्नमाला रामचंद्र झिटे, कुंदा अशोक पवार, मंदा रोहीदास कांबळे, दत्तात्रेय रामा म्हात्रे, रामचंद्र नगु म्हात्रे, महेंद्र केशव पडवळ, संजय रामदास गायकर, नितीन एकनाथ गायकर, कैलास कृष्णा ठाकुर | बोजा - सहकारी बँक दिनांक १६/११/२०१८ रोजी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. चा कैलास कृष्णा ठाकुर यांच्या नावे र.रु.१०००००/- | |

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- २/१/२०२६

सही/-
**(मुकेश चव्हाण)**
**उपविभागीय अधिकारी अलिबाग**
**उपविभाग अलिबाग**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/३३९/२३/२०२६**

# बांगलादेशला भारताशी पंगा महागात पडणार



| ढाका | वृत्तसंस्था |

भारत-बांगलादेश यांच्यातील वाढता तणाव पाहता मुस्तफिजुर रहमान याची आयपीएलच्या १९ व्या मोसमातून हकालपट्टी करण्यात आली. रहमानवरील या कारवाईनंतर बांगलादेश क्रिकेट बोर्ड आक्रमक झाला आहे.

बीसीबीने आयसीसीला पत्राद्वारे ते भारतात वर्ल्ड कप स्पर्धेतील सामने खेळणार नसल्याचं कळवलं आहे. तसेच बांगलादेशचे सामने भारताऐवजी सामने श्रीलंकेत खेळवण्यात यावेत, अशी विनंती बीसीबीने आयसीसीला केली आहे. भारत यजमान असला तरी इथे सामने खेळण्यासाठी न आल्यास बांगलादेशलाच आर्थिक तोटा सहन करावा लागू शकतो.

आयसीसीच्या वर्ल्ड कप स्पर्धेच्या यजमानपदासाठी काही अटी आणि निकष आहेत. त्यानुसार बीसीसीआयने २०२३ च्या वनडे वर्ल्ड कप स्पर्धेआधी आयसीसीचे निकष पूर्ण करण्यासाठी प्रत्येकी स्टेडियमच्या दुरुस्तीसाठी ५० कोटी खर्च केले होते. यजमान देशाकडून

## कोट्यवधींचा बसणार फटका

बहुतांश खर्च हा स्पर्धेसाठी केला जातो. त्यामुळे एका सामन्यासाठी एकूण किती कोटी रुपये खर्च होतात? हे अचूक किंवा अंदाजे सांगता येत नाही.

भारतात वर्ल्ड कप स्पर्धेसाठी न आल्यास बीसीसीआयला नाही तर बांगलादेशला फटका बसेल. संबंधित संघाने वर्ल्ड कप स्पर्धेतील नियोजित सामने खेळण्यास नकार दिल्यास ठराविक रक्कम आणि बक्षिस राशी मिळत नाही. त्यामुळे बांगलादेशला भारतात न येणं चांगलंच महागात पडू शकतं. तसेच बांगलादेशने भारतात ऐनवेळेस येण्यास नकार दिल्यास त्यांच्या विश्वासहर्तेवर प्रश्न उपस्थित होतील. त्याचे परिणाम संबंधित संघाला द्विपक्षीय मालिकेत किंवा बहुरराष्ट्रीय स्पर्धेत भोगावे लागू शकतात.

बांगलादेश भारतात वर्ल्ड कप स्पर्धेसाठी न येण्यावर ठाम आहे. बांगलादेश न आल्यास भारताला वेळापत्रकात ठिकाण बदलावं लागेल. त्यामुळे बीसीसीआय आणि आयसीसीला जाहीरातीतून मिळणारी रक्कम काही प्रमाणात कमी मिळेल. मात्र बीसीसीआय ती तूट आयपीएल आणि इतर स्पर्धेतून भरुन काढू शकते.

## वर्ल्ड कपच्या आयोजनाचा खर्च

वर्ल्ड कप स्पर्धेचं यजमानपद भूषवणाऱ्या देशाला चांगलाच खर्च करावा लागतो. भारतात २०२३ साली एकदिवसीय वर्ल्ड कप स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. तेव्हा वर्ल्ड कप स्पर्धेतील एका मॅचची फक्त ब्रॉडकास्टिंग वॅल्यू ही अंदाजे १३८.७ कोटी रुपये इतकी असल्याचं बीसीसीआय आणि आयसीसीने स्पष्ट केलं होतं. एका सामन्याचा ब्रॉडकास्टिंगचा अंदाजे खर्च. त्याव्यतिरिक्त यजमान देशाला वर्ल्ड कप स्पर्धेआधी स्टेडियमची डागडुजी करावी लागते.

# एकट्या मुस्तफिजूरसाठी बांगलादेश वेठीला

| ढाका | वृत्तसंस्था |

बीसीसीआयने अलीकडेच आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाइट रायडर्सला बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमान याला संघातून मुक्त करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर लगेचच केकेआरने मुस्तफिझूरला आपल्या संघातून बाहेर काढले. या निर्णयामुळे बांगलादेशमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, आता त्यांनी मोठे पाऊल उचलले आहे.

बांगलादेश सरकारने जगातील सर्वात लोकप्रिय क्रिकेट लीग इंडियन प्रीमियर लीगच्या प्रसारणावर अनिश्चित काळासाठी बंदी घातली आहे. या निर्णयामुळे बांगलादेशमधील आयपीएलप्रेमी क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, गेल्या महिन्यात अबूधाबी येथे झालेल्या मिनी ऑक्शनमध्ये केकेआरने मुस्तफिझूर रहमानला ९.२० कोटी रुपयांना विकत घेतले होते.

बांगलादेशच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने ५ जानेवारी रोजी देशातील सर्व टेलिव्हिजन चॅनल्सना आयपीएलचे प्रसारण तात्काळ थांबवण्याचे आदेश दिले. हा आदेश अधिकृत पत्राद्वारे देण्यात आला आहे.या पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, बीसीसीआयने कोणतेही ठोस कारण न देता बांगलादेशचा स्टार खेळाडू मुस्तफिझूर रहमान याला आगामी आयपीएल हंगामातून बाहेर काढल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकारामुळे बांगलादेशच्या जनतेमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची भावना निर्माण झाली आहे.



## निवडक



### पनवेल पत्रकार संघ विजयी

रसायनी : पत्रकार दिनाचे औचित्य साधून भाताण येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आयोजित वेध विकासाचा पत्रकार चषक २०२६ या स्पर्धेत पत्रकारांच्या झालेल्या सामन्यात पनवेल पत्रकार संघाने बाजी मारली आणि विजयश्री खेचून आणली. या सामन्यांचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्याहस्ते करण्यात आले.

भाताण येथे पत्रकार चषकाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कर्जत खालापूर पत्रकार संघ आणि पनवेल पत्रकार संघ यांच्यात दोन षटकांचा सामना खेळवण्यात आला. यावेळी नाणेफेक जिंकून कर्जत खालापूर पत्रकार संघाने प्रथम फलंदाजी स्वीकारली. यावेळी दोन षटकांमध्ये १६ धावा फटकावल्या आणि पनवेल पत्रकार संघापुढे १७ धावांचे आव्हान ठेवले. प्रत्युत्तरादाखल मयुर तांबडे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल संघाने एकही विकेट न गमावता शेवटच्या चेंडूपर्यंत सामन्यात चुरस आणली. शेवटच्या एक चेंडूत एक धाव असताना चौकार लागावल्याने पनवेल पत्रकार संघ विजयी ठरला. या सामन्याचे मानकरी चौलकर ठरले त्यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. पनवेल पत्रकार संघाला ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. प्रमुख मान्यवर मनसे तालुकाध्यक्ष रामदास पाटील, अ‍ॅड. संतोष खांडेकर, माजी उपसभापती वसंत काठवले, उद्योजक मोहन लबडे, अनंता पाटील, अविनाश गाताडे, शिवाजी माळी, अनिल पाटील, नितीन पाटील, सुभाष लाखांबले, महादेव पाटील, तानाजी पाटील, सरपंच भाताण अरुण पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल काठवले, ग्रामपंचायत सदस्य संजय घरत, सरपंच कसलखंड नंदू पाटील, खालापूर, पनवेल, कर्जत, पेण तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने हजर होते.



### कराटे प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप

**रायगड** : रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे नुकताच कराटे प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम सोहळा संपन्न झाला. जय शोतोकॉन कराटे आणि स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या तर्फे संस्थेचे अध्यक्ष संतोष कवळे यांच्या मार्गदर्शनाखाली साखर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना एक महिन्याचे कराटे प्रशिक्षण मोफत देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून निकिता थळे (ब्लॅक बेल्ट) यांनी उत्तम कामगिरी बजावली. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष कवळे, प्रशिक्षक निकिता थळे, साखर येथील दानशूर व्यक्ती निलेश चौलकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तेजस तांडेल, उपाध्यक्ष रेश्मा भुकवार, सदस्य हरेश्वर गोतकर, अंकिता भुकवार, भावना जगू, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील व उपशिक्षिका स्मिता चिखले व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### पोलार्ड अन् शाह यांच्यात वाद

दुबई : दुबई इंटरनॅशनल स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यादरम्यान, डेझर्ट वायपर्सचा गोलंदाज नसीम शाह आणि एमआय एमिरेट्सचा कर्णधार किरॉन पोलार्ड यांच्यात वाद झाला, ज्यामुळे जेतेपदाच्या लढतीत तणाव निर्माण झाला. एमआय एमिरेट्सच्या डावातील ११ व्या षटकात ही घटना घडली. नसीम शाहने षटकाचा शेवटचा चेंडू टाकला तेव्हा नॉन-स्ट्रायकर एंडवर उभ्या असलेल्या पोलार्डने नसीमला काहीतरी म्हटले. नसीमने लगेचच त्याला उत्तर दिले, ज्यामुळे वाद वाढला. दोन्ही खेळाडूंमध्ये बाचाबाची तीव्र झाली. परिस्थिती शांत करण्यासाठी मैदानावरील पंचांना हस्तक्षेप करावा लागला. वाद तिथेच संपला नाही. नसीम जेव्हा त्याचा पुढचा स्पेल टाकायला आला तेव्हा पोलार्डने त्याला चिथावणी दिल्याचे दिसून आले. पण यावेळी नसीम शाहने चेंडूने प्रत्युत्तर दिले. डावाच्या १७ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर नसीमने पोलार्डला पायचीत केले.

# तेंडुलकरचा विक्रम धोक्यात!



| सिडनी | वृत्तसंस्था |

अखेरच्या अ‍ॅशेस कसोटी सामन्यात अनुभवी फलंदाज जो रूटनं दमदार शतक झळकावले. त्याच्या विक्रमी शतकाच्या जोरावर इंग्लंडच्या संघाने पहिल्या डावात सर्व बाद ३८४ धावांपर्यंत मजल मारली. मोठ्या शतकी खेळीसह जो रुटनं ऑस्ट्रेलियाचा महान फलंदाज रिकी पाँटिंगचा मोठा विक्रम मोडीत काढला. आता त्याच्या नजरा विक्रमादित्य सचिन तेंडुलकरच्या ऐतिहासिक विक्रमावर आहेत.

जो रुटनं २४२ चेंडूत १५ चौकाराच्या मदतीने १६० धावांची खेळीसह रिकी पाँटिंगला मागे टाकले आहे. कसोटीत सर्वाधिक वेळा १५० किंवा त्यापेक्षा अधिक धावा करणाऱ्या बॅटरच्या यादीत तो पाँटिंगच्या पुढे निघून गेला आहे. याशिवाय ४१ व्या शतकासह रुटनं कसोटीत सर्वाधिक शतके झळकवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पाँटिंगच्या विक्रमाशी बरोबरी करण्याचा डावही साधला आहे. कसोटीत सर्वाधिक वेळा १५० पेक्षा अधिक धावा करण्याचा विक्रम अद्यापही मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या नावे आहे.

# भवानी नडगावची चॅलेंजर कुडूक चषकावर बाजी

| महाड | प्रतिनिधी |

ग्रामीण भागासह शहरातील विविध ठिकाणी वास्तव्यास असणारे खेळाडूंनी महाड तालुक्यातील भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय भेलोशी मैदानात मंडणगड तालुक्यातील कुडूक येथील चॅलेंजर कुडूक मित्र मंडळानी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये खुला गट संघातील २४ तर तालुका महाड ग्रामीण असोसिएशन मर्यादित २४ संघानी क्रिकेट स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. खुला गटामध्ये श्री माऊली क्रिकेट क्लब चांदणीकोंड प्रथम क्रमांक पटकावले तर भवानी नडगांव क्रिकेट संघानी एक गाव एक संघामध्ये बाजी मारली.

चॅलेंजर कुडूक क्रिकेट संघ आणि मित्र मंडळातील गावातील मुंबई पुणे येथील पदाधिकारी सदस्यांच्या, आणि सहभागी झालेल्या क्रिकेट संघाच्या उपस्थितीत परंपरा कलेची मोरे घराण्याची निर्मित चॅलेंजर कुडूक गौरव गीत सादर करण्यात आले.

अंतिम सामन्यात श्री माऊली क्रिकेट क्लब चांदणीकोंड प्रथम क्रमांक, शिवांश इलेव्हन कुडूक संघ द्वितीय तर श्री राम मंदिर ट्रस्ट जगदंब खुटिल तृतीय क्रमांक खुला गट खेळण्यात आलेल्या स्पर्धेत निवड झाली तर तालुका महाड ग्रामीण असोसिएशन मर्यादित स्पर्धेत भवानी नडगांव क्रिकेट संघ प्रथम क्रमांक मानकरी ठरला तर उपविजेता जननी देवी क्रिकेट संघ जुई, तृतीय क्रमांक एन्जॉय आंबवली ठरला.

यासोबतच मालिकावीर अक्षय तर गोलंदाज प्रवीण तर फलंदाज सुरज यांनी व्यक्तिगत कामगिरी करून संघाला विजयी केले असून सहभागी झालेल्या ४८ संघातील सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूंना सामनावीर म्हणून पदक देण्यात आले होते.

# एम्बापेला गंभीर दुखापत

**पॅरिस** : रिअल माद्रिदचा फॉरवर्ड खेळाडू किलियन एम्बापेच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली असल्याची माहिती त्याच्या स्पॅनिश क्लबने दिली. एम्बापेला सातत्याने वेदना जाणवत असल्याचे आढळून आले असून यातून सावरण्यासाठी त्याला किती वेळ लागेल, याबाबत क्लबने कोणतीही माहिती दिलेली नाही. एम्बापे ३ आठवड्यांसाठी मैदानाबाहेर असेल. एम्बापे या हंगामात बहरात राहिला. या महिन्याच्या सुरुवातीला त्याने माद्रिदसाठी आपला ५९ वा गोल केला आणि याचवेळी त्याने ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या एका वर्षातील सर्वाधिक गोल करण्याच्या क्लब विक्रमाची बरोबरी केली होती.

# श्रेयस अय्यर बनणार कर्णधार

| मुंबई | प्रतिनिधी |

भारताच्या वनडे संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर पुनरागमन करण्यास सज्ज आहे. तो जवळपास तीन महिने क्रिकेटला दुखापतीमुळे मुकला होता. पण आता तो मैदानात परतणार आहे, तेही तो नेतृत्व करताना दिसणार आहे. श्रेयसची आगामी न्यूझीलंड विरूद्धच्या वनडे मालिकेसाठीही भारतीय संघात निवड झाली आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सचिव डॉ. उन्मेश खानविलकर यांनी महचले आहे की विजय हजारे ट्रॉफीतील उर्वरित साखळी सामन्यात श्रेयस अय्यरला कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात मुंबई क्रिकेट असोसिएशनला आनंद होत आहे. तो शार्दुल ठाकूरच्या जागेवर ही जबाबदारी हाती घेईल.



श्रेयस अय्यर अनुभवी खेळाडू असून तो खेळ चांगला समजतो. त्याच्यावर असोसिएशनला विश्वास असून मुंबई संघ त्याच दृढनिश्चयाने खेळले.

श्रेयस अय्यरसह मुंबईच्या शेवटच्या दोन्ही साखळी सामन्यात सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेही खेळणार आहेत. हे सामने श्रेयससाठी महत्त्वाचे आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये सिडनीत वनडे सामना खेळताना त्याला बरगड्यांजवळ दुखापत झाली होती. त्यामुळे तो आठवडाभर हॉस्पिटलमध्ये होता.

# स्टोक्स-लाबुशेन यांच्यात बाचाबाची!

| सिडनी | वृत्तसंस्था |

सिडनीमध्ये खेळल्या जाणाऱ्या ५ व्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी प्रचंड गोंधळ उडाला. ऑस्ट्रेलियन फलंदाज मार्नस लाबुशेन हा अनेकदा विरोधी खेळाडूंना चिथावणी देण्यासाठी ओळखला जातो. यावेळीही त्याने तेच केले. असो, ऑस्ट्रेलियन संघ अ‍ॅशेस मालिकेत ३-१ ने आघाडीवर आहे आणि त्यामुळेच कांगारूंचा आत्मविश्वास उंचावला आहे.

सिडनी कसोटीच्या दुसऱ्या दिवशी लॅबुशेनची इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सशी भांडण झाले आणि त्यानंतर मैदानावर दोघांमध्ये जोरदार वाद झाला.

सिडनी कसोटीत इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जो रूटच्या शानदार शतकामुळे इंग्लंडने धावफलकावर ३८४ धावा केल्या. तथापि, ट्रॅव्हिस हेड पुन्हा एकदा इंग्लंडसाठी डोकेदुखी ठरला, त्याने आक्रमक खेळ करत ऑस्ट्रेलियाला दमदार सुरुवात करून दिली. त्याने मार्नस लाबुशेनसोबत दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली.

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स ट्रॅव्हिस हेड आणि मार्नस लॅबुशेन यांच्यातील धोकादायक भागीदारी तोडण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत होता. तो त्याच्या सर्व शक्तीनिशी गोलंदाजी करत होता, पण त्याला यश मिळत नव्हते. जेव्हा दोघांनी १०० धावांची भागीदारी केली तेव्हा स्टोक्स थोडासा अस्वस्थ दिसत होता आणि त्याने गुडघ्यावर हात ठेवला होता. इंग्लंडच्या कर्णधाराला या अवस्थेत पाहून लॅबुशेनला आनंद झाला आणि त्याने काही कमेंट्स केल्या. स्टोक्सचा आवाज त्याच्या कानावर पडला आणि परिस्थिती आणखी बिकट झाली.

प्रथम, बेन स्टोक्स ऑस्ट्रेलियन फलंदाजाजवळ गेला आणि काहीतरी बोलला. जेव्हा लॅबुशेन गप्प राहिला, तेव्हा इंग्लंडचा कर्णधार पटकन त्याच्या जवळ गेला आणि मागून त्याच्या मानेवर हात ठेवला. त्यानंतर तो रागाने बोलला, ऑस्ट्रेलियन फलंदाज काय बोलण्याचा प्रयत्न करत आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करत. सिडनीतील हजारो चाहत्यांनी या वादामुळे खूप मनोरंजन केले. पंचांनी स्टोक्स आणि लॅबुशेनला शांत केले.

## एमसीए आयोजित मुलींची क्रिकेट स्पर्धा | सुपर लिगमध्ये दिमाखदार मिळवला प्रवेश

# रायगडच्या मुलींनी जिंकलं मैदान

| रायगड | प्रतिनिधी |

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या आंतरजिल्हा निमंत्रित संघांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगडच्या मुलींच्या संघाने, पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या शेवटच्या अटीतटीच्या साखळी फेरीतील सामन्यात सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींच्या संघावर एक गडी राखून दिमाखात विजय मिळवला .

पुढील होणाऱ्या सुपर लिग सामन्यांसाठी दमदारपणे प्रवेश मिळवला आहे. अतिशय अटीतटीच्या झालेल्या सामन्यात रायगडच्या संघाला जिंकण्यासाठी दहा धावांची गरज होती तर साताऱ्याच्या संघाला एक विकेट हवी होती, हा सामना पाहण्यासाठी रायगड जिल्ह्यातील प्रेक्षकांनी मैदानावर मोठ्या संख्येने गर्दी केली होती. अशावेळी रायगडच्या दोन रणरागिणी समिधा तांडेल व स्वरा भगत मैदानावर झुंज देत उभ्या होत्या.

समिधा तांडेल हिने चौकार ठोकत सामना रायगडच्या बाजूने वळवला होता तर अखेरच्या क्षणी पेणच्या स्वरा शेखर भगत हिने आपल्या घरच्या मैदानावर विजयी चौकार मारत रायगडच्या संघाला विजयी मिळवून दिला आणि मैदानावर एकच जल्लोष सुरू झाला.



रायगडच्या मुलींच्या संघाने एक गडी राखून विजय मिळवत इतिहास रचला असून साखळी फेरीतील पाच पैकी चार सामने जिंकत सुपर लिग सामन्यांसाठी प्रवेश निश्चित केला आहे. एखरच्या निर्णायक सामन्यात साताऱ्याच्या संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करतांना ३९.२ षटकांमध्ये सर्व गडी बाद १३५ धावसंख्या उभारली त्यामध्ये आर्या फडतरे हिने सर्वाधिक ३६ धावा संघासाठी काढल्या तर रायगड कडून वेदिका तेटगुरे हिने ४ समिधा तांडेल ३ तर स्वरा खेडेकर हिने २ फलंदाज बाद केले.

१३६ धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीसाठी आलेल्या रायगडच्या मुलींच्या संघाने ४५.२ षटकांमध्ये ९ गडी गमावत १३८ धावा काढून विजय मिळवला त्यामध्ये रायगडची सलामीवीर तंत्रशुद्ध तडाखेबाज फलंदाज ब्रतती राय हिने सर्वाधिक ४९ धावांची दमदार खेळी केली तिला संस्कृती पालकर हिने ३० धावा करून साथ दिली तर शेवटच्या विकेट साठी झुंझार खेळी करणाऱ्या समिधा तांडेल व स्वरा भगत यांनी जिंकण्यासाठी आवाक्षक असणाऱ्या निर्णायक धावा काढून रायगडच्या मुलींच्या संघाला विजय मिळवून दिला.

याआधी रायगडचा मुलांचा चौदा वर्षाखालील संघ देखील एमसीएच्या सुपर लीगसाठी पात्र झाल असून आता एकोणीस वर्षाखालील मुलींच्या संघाने सुधा दमदार कामगिरी करत सुपर लिगसाठी पात्रता मिळवली आहे.

रायगड जिल्ह्यातील लेदर बॉल क्रिकेटचे भवितव्य उज्ज्वल असून रायगडची अष्टपैलू खेळाडू रोशनी पारधी हिची निवड महाराष्ट्राच्या मुलींच्या संघात झाली आहे,त्याच बरोबर प्रत्येक वयोगटातील मुलामुलींची निवड एमसीएच्या वतीने महाराष्ट्राच्या संघात व निवड चाचणी शिबिरासाठी होत आहे. नवी कार्यकारिणी कमिटी झाल्यापासून गेल्या दीड वर्षांत प्रत्येक वयोगटातील निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले गेले आहे. जवळपास ६०० सामन्यांचे आयोजन आरडीसीएच्या वतीने करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यावेळी सामना पाहण्यासाठी उपस्थित होते त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रायगडच्या सर्व लढवय्या मुलींचे कौतुक व अभिनंदन केले आहे, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने मुलांच्या बरोबरीने मुली सुद्धा उत्तम खेळाचे प्रदर्शन करत असल्याचा सर्वांना अभिमान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)